साथी संस्था, पुणे संचलित व
कर्वे समाज सेवा संस्था, पुणे, मान्यताप्राप्त

प्रमाणपत्र कोर्स

आरोग्यसेवांवर सामाजिक उत्तरदायित्व

सामाजिक सेवांच्या उत्तरदायित्वाविषयी स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या
कार्यकर्त्यांचा दृष्टिकोन सखोल व व्यापक करण्यासाठी....

दूरस्थ शिक्षण अभ्यासक्रम कोर्स

मोड्युल - ३

लोकशाहीचे घटक व लोक सहभागातून

आरोग्यसेवांचे नियोजन

- संकलन व लेखन
  हेमराज पाटील
  विनोद शेंडे

- मार्गदर्शन
  डॉ. नितिन जाधव

- मुखपृष्ठ
  भाऊसाहेब आहेर
  गजानन लोंढे

- मांडणी
  शारदा महल्ले

- **मार्च, २०१६**

- **प्रकाशक**

SATHI
Flat No. 3 & 4, Aman E Terrace, Dahanukar Colony, Kothrud, Pune - 411029
Ph. No. (020) 25472325, 7588032218
Website - www.sathicehat.org, Email - sathicehat@gmail.com

आयोजक

साथी

मान्यता

ESTD. 1963
कर्वे समाज सेवा संस्था

अर्थसाहाय्य

कोपासा

मोड्युल - ३

लोकशाहीचे घटक व लोकसहभागातून

आरोग्यसेवांचे नियोजन

सामाजिक सेवांच्या उत्तरदायित्वाविषयी स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या

कार्यकर्त्यांचा दृष्टिकोन सखोल व व्यापक करण्यासाठी....

दूरस्थ शिक्षण अभ्यासक्रम कोर्स

संकलन

हेमराज पाटील

विनोद शेंडे

मार्गदर्शन

डॉ. नितिन जाधव

साथी

या कोर्सविषयी थोडक्यात...

भारतात गेल्या दशकभरात सार्वजनिक आरोग्यसेवांमध्ये सुधारणा घडविण्यासाठी, आरोग्य यंत्रणा व जनतेमध्ये संवादाची प्रक्रिया घडविण्यासाठी, आरोग्य यंत्रणेचे जनतेप्रती उत्तरदायित्व व आरोग्यसेवांमधील पारदर्शकता वाढण्यासाठी विविध संस्था-संघटनांनी प्रयत्न केले आहेत. त्याची परिणिती म्हणूनच भारतात लोकाधारित देखरेखीचे विविध नमुने विकसित झाले आहेत. तुमच्या सारखे गावपातळीवर काम करणारे कार्यकर्ते विशेष करून लोकाधारित देखरेख राबवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळेच महाराष्ट्रात तरी लोकाधारित देखरेखीची संकल्पना रुजत आहे. आमच्या मते संकल्पनेचा विस्तार व्हायला हवा. त्यासाठी नवीन कार्यकर्त्यांची फळी उभी करणे ही गरज लक्षात घेता हा कोर्स घेण्यात येत आहे.

हा अभ्यासक्रम संपूर्ण महाराष्ट्रभर राबविण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, उत्तर महाराष्ट्र या विभागातील एकूण १२५ विद्यार्थी कार्यकर्त्यांचा समावेश असणार आहे. प्रत्येक विभागातून २५ विद्यार्थी कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली आहे.

हा कोर्स 'साथी' संस्था'व सामाजिक कार्याचे पदव्युत्तर शिक्षण (MSW) देणाऱ्या 'कर्वे समाजसेवा संस्था' यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येत आहे. या कोर्सला आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्यसेवांवर सामाजिक उत्तरदायित्व व कृतीसाठी काम करणाऱ्या 'कोपासा' (Community of Practitioners on Accountability and Social Action in Health) या आंतरराष्ट्रीय समूहाचे आर्थिक सहकार्य मिळाले आहे. हा कोर्स मुख्यत्वे दूरस्थ शिक्षण (distance-learning) प्रकारचा असून या कोर्सचा कालावधी एक वर्षाचा आहे. वर्षभरात दोन संपर्क सत्र आयोजित (contact session) केले जाणार असून पहिले संपर्क सत्र हे ३ दिवसांचे असेल तर दुसरे संपर्क सत्र हे एक दिवसाचे असेल. पहिल्या संपर्क सत्रात सहभागी प्रतिनिधींना प्रशिक्षण व कोर्ससंबंधी प्रशिक्षण साहित्य देण्यात येईल. तर दुसऱ्या संपर्क सत्रात परीक्षा व विद्यार्थी कार्यकर्त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात केलेल्या उपक्रमांबद्दल चर्चा करण्यात येईल. विद्यार्थी कार्यकर्त्यांनी पहिल्या संपर्क सत्रानंतर आपल्या कार्यक्षेत्रात मार्गदर्शक पुस्तकात दिल्याप्रमाणे गतिविधी (Field Activity) करणे अपेक्षित आहे.

या अभ्यासक्रमाचे मुख्य उद्दिष्टये

- विविध आरोग्यसेवा व सामाजिक सेवांवर उत्तदायित्व हे तत्त्व समजून घेण्यासाठी कार्यकर्त्यांची व्यापक समज आणि दृष्टिकोन विकसित करणे.
- विविध सामाजिक संघटनांकडून धोरण वकिली/जनवकालत वापरण्यात येणाऱ्या विविध पद्धतींचा व रणनीतिबाबत दृष्टिकोन व समज वाढवणे.

मार्गदर्शक पुस्तिका (मोड्युल) विषयी थोडक्यात...

भारतामध्ये लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार भारतीय राज्यघटनेद्वारे केला आहे. लोकशाही शासनपद्धतीमध्ये नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असतो. लोकशाही व्यवस्थेत लोकांच्या सहभागाने प्रशासनात पारदर्शकता व उत्तरदायित्व आणता येते. या संकल्पनेला घेऊनच लोकशाहीबाबत आपली समज व्यापक होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने या मोड्युलमध्ये मांडणी करण्यात आलेली आहे.

भारतातील लोकशाही ही प्रातिनिधिक लोकशाही असल्याने वरच्या स्तरावर लोकांचा प्रत्यक्ष सहभाग नसतो. परंतु राज्यघटनेतील तरतुदीनुसार स्थानिक पातळीवर जनतेला प्रत्यक्ष सहभागी होण्यासाठी विविध मार्ग आहेत. या मोड्युलमध्ये आपण लोकशाही म्हणजे काय? व लोकशाहीचे वेगवेगळे प्रकार समजून घेणार आहोत. तसेच प्रत्यक्ष लोकशाही पद्धतीमध्ये लोकांना सहभागी होण्याचे वेगवेगळे मार्ग कोणते आहेत, त्यांची वैशिष्ट्ये व या मार्गांचा उपयोग कसा करता येईल, याबाबत सविस्तर मांडणी या मोड्युलमध्ये करण्यात आलेली आहे.

शासनाच्या कोणत्याही नियोजनात लोकांच्या सूचना समाविष्ट करण्यासाठी विविध पद्धतीचा वापर केला जातो त्यातील एक महत्त्वाची पद्धत म्हणजे 'लोकसहभागामधून ग्रामीण परिस्थितीचा अभ्यास घेऊन स्थानिक पातळीवरील संसाधनांचे नियोजन.' लोकांच्या नेमक्या आरोग्य गरजा, आरोग्य समस्या शोधण्यासाठी स्थानिक परिस्थितीचा अभ्यास असणे गरजेचे आहे. त्याआधारेच आपण नियोजनासाठी सूचना देऊ शकतो. आजपर्यंत होत आलेल्या नियोजनात सूचना या वरूनच दिल्या जात होत्या. त्यामुळे स्थानिक पातळीवरच्या समस्यांवर आधारित नियोजन म्हणजे एक प्रकारचे मृगजळच होते.

कार्यकर्ता म्हणून आपल्याला आपल्या परिसरात आरोग्यसेवांची स्थिती कशी बळकट करता येऊ शकते, लोकसहभागी नियोजनात लोकसहभागाचे महत्त्व आणि भूमिका काय असाव्यात? अशा बऱ्याच प्रश्नांची उत्तरे, सूचनांचा शोध आपण मिळून घेण्याचा एक छोटासा प्रयत्न या मार्गदर्शिकेतून करत आहोत.

हे मोड्युल विकसित करण्यासाठी 'साथी' संस्थेच्या विविध प्रकाशनांची मदत झाली असून, 'कर्वे समाज सेवा' संस्था व आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्यसेवांवर सामाजिक उत्तरदायित्व व कृतीसाठी काम करणाऱ्या 'कोपासा' या नेटवर्कच्या स्टेअरिंग कमिटीने या मोड्युलचे समीक्षण केले आहे.

अनुक्रमणिका

प्रकरण १-

लोकशाहीची संकल्पना व प्रत्यक्ष लोकशाही.....५

प्रकरण २-

प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये जनतेचा सहभाग घेण्यासाठीचे विविध मार्ग.....१४

प्रकरण ३-

लोकसहभागाचे घटक व लोकाधारित नियोजनचे महत्त्व.....३४

परिशिष्ट-

आरोग्य ग्रामसभा शासन निर्णय ५१

प्रकरण-१

लोकशाहीची संकल्पना व प्रत्यक्ष लोकशाही

१.१ उद्देश

- **लोकशाहीची संकल्पना, लोकशाहीचे विविध प्रकार व प्रत्यक्ष लोकशाहीची संकल्पना संकल्पना समजून घेणे.**
- **भारतीय लोकशाहीची विविध वैशिष्ट्ये समजून घेणे.**

१.२ कोणता दृष्टिकोन विकसित होईल

या प्रकरणातून लोकशाही म्हणजे काय? लोकशाहीची संकल्पना, लोकशाहीचे विविध प्रकार व प्रत्यक्ष लोकशाही म्हणजे काय याबाबत समज विकसित होईल.

१.३ राज्यपद्धती आणि लोकशाहीची संकल्पना

लोकशाहीची संकल्पना समजून घेताना आपल्याला प्रथम लोकशाहीची व्याख्या व त्याची विविध देशातील लोकशाहीची उदाहरणे समजून घेणे आवश्यक आहे.

जगभर मुख्यतः चार प्रकारच्या राज्यपद्धती पुरातन काळापासून अस्तित्त्वात आहेत.

१) **एकलायतन :** एका व्यक्तीचे राज्य, राजेशाही किंवा तानाशाही. पाकिस्तानमधील अलीकडच्या काळापर्यंतचे सैन्यप्रमुखाचे साधन हे या राज्यपद्धतीचे उदाहरण.

२) **अल्पसंख्यायतन :** मध्ययुगीन भारतातील 'सामंतशाही' याचे उदाहरण आहे. काही निवडक सरदार किंवा प्रभावी लोकांचे राज्य. सध्याच्या काळात चीन आणि रशिया देशात एकाच पक्षातील राज्य चालते.

३) **बहुसंख्यायतन :** बहुसंख्य लोकांचे म्हणजे बहुमताचे राज्य. भारत, पाकिस्तान, बांग्लादेश, अमेरिका यासारख्या अनेक 'लोकशाही' म्हणवल्या जाणाऱ्या देशात या पद्धतीचे राज्य आहे.

४) **सकलायतन :** सर्वांचे राज्य, ज्यात एका व्यक्तीच्या मतालाही मान असतो. सध्याच्या काळात नागालँड राज्यातील, आदिवासी ग्राम परिषद आणि गडचिरोली जिल्ह्यातील मेंढा (लेखा) गावाची 'ग्रामसभा' हे या राज्यपद्धतीचे उदाहरण आहे. देशपातळीवर मात्र या राज्यपद्धतीचा अनुभव

नाही. लोकांचे, लोकांसाठी, लोकांनी चालविलेले राज्य म्हणजे 'लोकशाही' अशी साधी सोपी व्याख्या करण्यात आलेली लोकशाही मुख्यतः बहुमत आधारे चालते. या राज्यपद्धतीच्या ढोबळ मानाने दोन प्रमुख प्रणाली आहेत.

१) अध्यक्षीय लोकशाही : बहुमताने निवडून आलेला एक व्यक्ती 'राष्ट्राध्यक्ष' बनतो व त्याने निवडलेल्या सहकारी मंत्र्यांच्या सहकार्याने राज्यकारभार चालवितो. अमेरिका देशात अध्यक्षीय प्रणालीची लोकशाही आहे.

२) सांसदीय लोकशाही : बहुमताने निवडून आलेले संसद प्रतिनिधी (खासदार) पंतप्रधानाची निवड करतात व पंतप्रधानाने निवडलेल्या मंत्रिमंडळाच्या आधारे राज्यकारभार चालविला जातो. भारत, पाकिस्तान, श्रीलंका आदि अनेक देशांमध्ये सांसदीय प्रणालीची लोकशाही आहे.

वरील दोन्ही प्रणालींमध्ये लोक प्रत्यक्ष राज्यकारभारात नसतात. लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी लोकांच्या वतीने राज्यकारभार चालवितात. त्यामुळे या दोन्ही प्रणालींना 'प्रातिनिधीक लोकशाही' असेही म्हणतात. राज्यकारभारात लोकांचा प्रत्यक्ष सहभाग नसल्याने या दोन्ही प्रणालींना अप्रत्यक्ष लोकशाही असेही ओळखले जाते.

त्याउलट राज्यकारभारात लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असल्यास त्याला 'प्रत्यक्ष लोकशाही' म्हणता येईल. आपल्या जीवनाशी संबंधित एक किंवा अनेक गोष्टी (उदा. शिक्षण, आरोग्य, उपजीविका आदि) नियोजन, निर्णय, संसाधनांची जुळवाजुळव, अंमलबजावणीवर देखरेख निर्णयाचे पुनरावलोकन व पुनर्विचार, पुन्हा नव्याने नियोजन या सर्व पातळीवर लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असल्यास ते प्रत्यक्ष लोकशाहीचे उदाहरण समजले जाईल.

सध्याच्या काळात मोठ्या प्रमाणात वापरण्यात येणाऱ्या 'लोकसहभाग' शब्दासोबत 'प्रत्यक्ष लोकशाही'ची गल्लत करू नये. शासनाकडून प्रोत्साहित करण्यात येणाऱ्या 'लोकसहभाग' प्रकारात नियोजन किंवा देखरेख संदर्भात लोकांचा विविध पद्धतीने सहभाग घेतला जातो. मात्र निर्णयाचे सर्वाधिकार लोकप्रतिनिधी किंवा मंत्रिमंडळ स्तरावर सुरक्षित असतात.

१.३.१ लोकशाही

जी शासनपद्धती जनतेच्या संमतीवर आधारलेली आहे आणि ज्यात प्रत्यक्ष जनतेला विचार, आचार, उच्चार व संघटनाचे स्वातंत्र्य असते, त्याला आपण 'लोकशाही' असे म्हणतो. लोकशाहीला इंग्रजीत 'डेमॉक्रसी' असे म्हटले जाते. 'डेमॉक्रसी' हा मुळचा ग्रीक भाषेतील शब्द आहे. 'डेमॉस' म्हणजे लोक आणि 'क्रेटॉस' म्हणजे राज्य, यावरून लोकांचे राज्य म्हणजे 'डेमॉक्रसी' हा ग्रीक शब्द तयार झाला.

लोकशाहीची सर्वसमावेशक व्याख्या करणे अवघड आहे. अब्राहम लिंकन या विचारवंताने लोकशाहीची एक सुटसुटीत व्याख्या केली आहे. ते म्हणतात "लोकांचे' 'लोकांकडून' व 'लोकांसाठी' चालविलेले 'राज्य' म्हणजे लोकशाही.' म्हणजे ज्या देशात नियोजन व निर्णयप्रक्रियेत प्रत्यक्ष स्थानिक जनतेचा/लोकांचा सहभाग असतो व ते लोक लोकहिताचे निर्णय घेतील. यामध्ये प्रत्यक्ष जनताच मालक असते. लोकशाही शासनव्यवस्थेत लोकांच्या मताला खूप महत्त्व आहे. जसे स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांमध्ये लोकमताला सर्वश्रेष्ठ स्थान आहे. जाणत्या, जागृत, सुबुद्ध व विकसित लोकमतावरच लोकशाहीचे यश अवलंबून असते.

याचे एक चांगले उदाहरण म्हणजे, ग्रीसमध्ये पूर्वी नगर राज्ये होती. शासनासंबंधीचे सर्व निर्णय नगरातील सर्व नागरिकांची सभा बोलावून प्रत्यक्ष बहुमताने घेतले जात. म्हणजे प्रत्यक्ष लोकांच्या सहभागाने निर्णय घेतले जात होते, म्हणून त्याला 'प्रत्यक्ष लोकशाही' असे म्हटले हाते.

१.३.२ लोकशाही शासनव्यवस्थेत पुढील घटक महत्त्वाचे असतात-

- लोकांचा प्रत्यक्ष नियोजन प्रक्रियेत सहभाग असावा.
- लोकांचा प्रत्यक्ष निर्णयप्रक्रियेत सहभाग असावा.
- लोकांना निर्णय घेण्याचे अधिकार असावेत.
- एखाद्या निर्णयाबाबत लोकांना आपले मत व्यक्त करता आले पाहिजे.

१.४ लोकशाहीचे प्रकार

जगातील विविध देशात लोकशाहीचे वेगवेगळे प्रकार अवलंबिले जातात. यामध्ये आपणास मुख्यतः दोन प्रकार आहेत.

१.४.१ प्रातिनिधिक लोकशाही

ज्या देशामध्ये लोक/जनता आपला प्रतिनिधी पाठवतात/नेमतात व त्याच्या माध्यमातून निर्णय घेतले जातात, त्याला प्रातिनिधिक लोकशाही म्हटले जाते. यालाच अप्रत्यक्ष लोकशाही असेही म्हटले जाते. या पद्धतीमध्ये प्रत्यक्ष जनतेचा कुठेही सहभाग नसतो. प्रत्यक्ष जनता आपला प्रतिनिधी प्रौढ मतदान पद्धतीने निवडतात आणि हे

प्रतिनिधी सर्व लोकांच्या वतीने नियोजन करतात, निर्णय घेतात व कारभार करतात. उदा. भारत.

भारतामध्ये आपण आपले प्रतिनिधी म्हणून प्रत्यक्ष मतदानाने ग्रामपंचायत सदस्य, आमदार व खासदार यांची निवड करतो. हे सदस्य त्या-त्या ठिकाणी (ग्रा.प.सदस्य- ग्रामपंचायत, प.स. सदस्य- पंचायत समिती, जि.प.सदस्य- जिल्हा परिषद, आमदार-विधीमंडळ, खासदार-संसद) लोकांचे प्रतिनिधित्व करतात. लोकांच्या वतीने आपली बाजू मांडतात व निर्णयप्रक्रियेत सहभागी होतात. या ठिकाणी प्रत्यक्ष जनता कुठेही सहभागी झालेली नसते.

१.४.२ प्रत्यक्ष लोकशाही

ज्या ठिकाणी निर्णयप्रक्रियेत प्रत्यक्ष लोकांचा सहभाग असतो व लोकच स्वतः शासनव्यवस्था चालवतात, त्याला 'प्रत्यक्ष लोकशाही' म्हणतात. यालाच प्युअर लोकशाही असेही म्हटले जाते. यामध्ये त्या ठिकाणचे लोक स्वतः एकत्र येऊन निर्णय घेतात व शासनव्यवस्था चालवतात. उदा. ग्रीस देशातील नगरराज्ये (शहरे). या ठिकाणी त्या-त्या नगरराज्यातील लोक निर्णय घेण्याच्या वेळी एकत्र येतात. त्याबाबत साधक-बाधक चर्चा करून निर्णय घेतात व त्याची अंमलबजावणी प्रशासनाच्या माध्यमातून करवून घेतात.

मात्र कमीत-कमी लोकसंख्येच्या ठिकाणीच ही पद्धती जास्त प्रभावी ठरू शकते, ही या लोकशाही प्रकाराची मर्यादाही लक्षात घेणे आवश्यक आहे. परंतु छोट्या-छोट्या प्रमाणावर प्रत्यक्ष लोकशाहीचा वापर करणे सहज शक्य आहे.

१.५ भारतीय लोकशाहीचे वैशिष्ट्य

भारतामध्ये जरी प्रातिनिधिक लोकशाही असली तरी आपणास प्रत्यक्ष लोकशाहीची काही उदाहरणे आपणास पाहायला मिळतात. प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या माध्यमातून कारभार चालत असला, तरी प्रत्येक व्यक्तीला तिचे मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. तसेच लोकशाही मार्गाने आपण लोकप्रतिनिधी व प्रशासनालाही जाब विचारू शकतो. एखाद्या सार्वजनिक हिताच्या निर्णयासाठी जनता कायदेशीर मार्गाने धरणे, आंदोलन, मोर्चा, निषेध करून आपले मत, मागण्या नोंदवू शकतात. हे भारतीय राज्यघटनेने लोकांना दिलेली एक महत्त्वाची जागा आहे. तसेच विविध स्तरावर जनतेला प्रत्यक्ष सहभागी होता येईल अशीही तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे लोकांना त्यांची मते, सूचना त्या-त्या ठिकाणी नोंदवता येतात. तसेच नियोजन व निर्णयप्रक्रियेतही सहभाग घेता येतो. हे भारतीय लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे.

- भारत देशाचे अधिकृत नाव 'रिपब्लिक ऑफ इंडिया' (भारताचे गणराज्य) असे आहे. 'गण' म्हणजे लोक. भारत देशाने स्वतःच्या नावासोबत 'लोकांचे राज्य' असल्याचे दर्शविणे महत्त्वाचे मानले आहे.
- दि. २६ जानेवारी १९५० रोजी भारताची राज्यघटना लागू करण्यात आली. हा दिवस दरवर्षी आपण 'भारतीय गणराज्य दिन' म्हणून साजरा करतो.
- सदर राज्यघटनेच्या (भारताचे संविधान) उद्देशिकांमध्ये भारतीय लोकशाहीची संकल्पना सार व उद्देश यांची स्पष्टता करण्यात आली आहे.
- भारताचे संविधान कोणी बनविले? कोणासाठी बनविले? कोणी मंजूर केले? कोणाला अर्पण केले? या सर्व प्रश्नांचे उत्तर एकच! आम्ही, भारताचे लोक.
- संविधान निर्मिती व मंजुरी सारख्या अति महत्त्वाच्या निर्णय प्रक्रियेतही लोकांचे सर्वोच्च स्थान प्रस्थापित करणारी लोकशाही ही भारताचे वैशिष्ट्य आहे.

भारताने 'प्रत्यक्ष लोकशाही' ला आदर्श मानले असले तरी राज्यकारभाराकरीता व्यावहारिक दृष्टिकोन स्वीकारून जगभर प्रचलित 'बहुमत' आधारित प्रातिनिधीक लोकशाहीला मान्यता दिली. भारतात सकलायतन, म्हणजे प्रत्येकाच्या मताला मान देणारी आणि प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात आल्यास ते अजिबात घटनाविरोधी ठरत नाही. याचे प्रसिद्ध उदाहरण गडचिरोली जिल्ह्यातील मेंढा (लेखा) गाव आहे.

दिल्ली-मुंबई आमचे सरकार
आमच्या गावात आम्हीच सरकार

"आमच्या गावालगतचे आमचे पारंपारिक हक्काच्या जंगलाचे संरक्षण आम्हीच करू." अशी भूमिका गावाने घेतली. वास्तविक वनसंरक्षण हे सरकारच्या वनविभागाचे काम असल्याची आपली सर्वमान्यता आहे. असे असतांनाही सरतेशेवटी भारतीय राज्यघटनेच्या पार्श्वभूमीत शासकीय वनविभागाला गावाची भूमिका स्वीकारावी लागली. दर पौर्णिमेला दुपारी बैठक करणारी 'ग्रामसभा' ही मेंढा (लेखा) गावाचे बलस्थान आहे. या ग्रामसभेला वय, लिंग कसलेच बंधन नाही. एका कुटुंबातून किमान एक पुरुष व एक महिला यांनी बैठकीत सहभागी व्हावे अशी रास्त अपेक्षा असते. बैठकीत निर्णय घेण्यासाठी मात्र 'सर्वसहमती' ही अट आहे. एका व्यक्तीनेही प्रस्तावाला विरोध दर्शविण्यास निर्णयप्रक्रिया स्थगित केली जाते. त्या व्यक्तीचे मत 'विरोधी' न समता 'वेगळे' समजले जाते. ती व्यक्ती आपले मत इतरांना समजावून देईल किंवा इतर जण आपले मत त्या व्यक्तीला समजावून देतील अशी संवाद प्रक्रिया चालते. कुठल्याही परिस्थितीत सर्वसहमती झाल्यावरच निर्णय घेतला जातो.

सध्या मुख्यतः उपजीविकासंबंधी नियोजन-निर्णय-संसाधनाची जुळवाजुळव-अंमलबजावणी देखरेख-निर्णय पुनर्विचार-नियोजन अशा चक्रात परिपूर्ण सहभागी असलेले हे गाव त्यांच्या राज्यकारभार स्वतःच चालवित आहेत. मग ते भारतीय राज्यघटनेला, भारतीय राज्यव्यवस्थेला मानत नाहीत काय? यावर गावकऱ्यांनी दिलेले उत्तर आता सर्वत्र प्रसिद्ध झालेला नारा आहे.

दिल्ली-मुंबई आमचे सरकार

आमच्या गावात आम्हीच सरकार

मेंढा (लेखा) गाववासियांप्रमाणे त्यांचा केंद्र व राज्य सरकारला अजिबात विरोध नाही. तेथे परक्यांचे नाही, आमचेच सरकार असल्याचे ते सांगतात. मात्र ते 'आमचे' म्हणजे प्रतिनिधींचे सरकार असल्याचे लक्षात आणून देतात. मात्र गावात आम्हीच निर्णयात असल्याने 'आम्ही' सरकार असल्याचे ते सांगतात.

प्रत्यक्ष आणि प्रातिनिधीक लोकशाहीचे हे जिवंत उदाहरण विस्ताराने समजून घेण्यासाठी वरिष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री. मिलिंद बोकील लिखीत 'गोष्ट मेंढा (लेखा) गावाची' हे पुस्तक जरुर वाचावे.

१.६ थोडक्यात पण महत्त्वाचे

- जी शासनपद्धती जनतेच्या संमतीवर आधारलेली आहे आणि ज्यात प्रत्यक्ष जनतेला विचार, आचार, उच्चार व संघटनाचे स्वातंत्र्य असते, त्याला आपण 'लोकशाही' असे म्हणतो.

- लोकशाही शासनव्यवस्थेत लोकांच्या मताला खूप महत्त्व आहे. जसे स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांमध्ये लोकमताला सर्वश्रेष्ठ स्थान आहे. जाणत्या, जागृत, सुबुद्ध व विकसित लोकमतावरच लोकशाहीचे यश अवलंबून असते.

- लोकशाहीचे प्रकार- १. प्रातिनिधिक लोकशाही २. प्रत्यक्ष लोकशाही

- प्रातिनिधिक लोकशाही पद्धतीमध्ये प्रत्यक्ष जनता आपला प्रतिनिधी प्रौढ मतदान पद्धतीने निवडतात आणि हे प्रतिनिधी सर्व लोकांच्या वतीने नियोजन करतात, निर्णय घेतात व कारभार करतात. यामध्ये प्रत्यक्ष जनतेचा कुठेही सहभाग नसतो.

- 'प्रत्यक्ष लोकशाही' म्हणजे ज्या ठिकाणी निर्णयप्रक्रियेत प्रत्यक्ष लोकांचा सहभाग असतो व लोकच स्वतः शासनव्यवस्था चालवतात.

- लोकशाही मार्गाने आपण लोकप्रतिनिधी व प्रशासनालाही जाब विचारू शकतो. एखाद्या सार्वजनिक हिताच्या निर्णयासाठी जनता कायदेशीर मार्गाने धरणे, आंदोलन, मोर्चा, निषेध करून आपले मत, मागण्या नोंदवू शकतात. ही भारतीय राज्यघटनेने लोकांना दिलेली एक महत्त्वाची जागा आहे.

- तसेच विविध स्तरावर जनतेला प्रत्यक्ष सहभागी होता येईल अशीही तरतूद राज्यघटनेने केली आहे. त्यामुळे लोकांना त्यांची मते, सूचना त्या-त्या ठिकाणी नोंदवता येतात. प्रत्यक्ष नियोजन व निर्णयप्रक्रियेतही सहभाग घेता येतो.

१.७ सरावासाठी प्रश्न

१.७.१ लोकशाही म्हणजे काय?

१.७.२ लोकशाहीचे कोणते प्रकार आहेत? त्याविषयी थोडक्यात माहिती लिहा.

१.७.३ तुमच्या माहितीतील प्रत्यक्ष लोकशाहीची दोन उदाहरणे थोडक्यात लिहा.

१.७.४ भारतीय लोकशाहीचे वैशिष्ट्य काय आहे?

१.७.५ भारतीय लोकशाही शासनव्यवस्थेचे महत्त्वाचे घटक कोणते?

प्रकरण–२

प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये जनतेचा सहभाग घेण्यासाठीचे विविध मार्ग

२.१ उद्देश

- **स्थानिक पातळीवरील प्रत्यक्ष लोकशाहीचे मार्ग समजून घेणे.**
- **लोकशाही व्यवस्थेत सहभागी होण्यासाठी व उत्तरदायित्वासाठी विविध मार्गांचा अवलंब करणे.**

२.२ कोणता दृष्टिकोन विकसित होईल

या प्रकरणातून प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये सहभागी होण्यासाठी विविध मार्गांची माहिती होईल. तसेच त्याचा विविध पातळीवर कसा उपयोग करायचा याबाबत समज विकसित होईल.

२.३ प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये जनतेचा सहभाग घेण्यासाठीचे विविध मार्ग

लोकशाही पद्धतीत लोकांच्या सूचना, इच्छा, आशा, आकांक्षा संबंधित प्रशासनाला किंवा सरकारला कळविता येतात. तसेच प्रत्यक्ष नियोजनात व निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्याचे विविध मार्ग अस्तित्वात आहेत. यामध्ये ग्रामसभा, सोशल ऑडिट, आमसभा, माहितीचा अधिकार, हमीच्या सेवांचा कायदा, जनसुनवाईसारख्या साधनांचा कार्यकर्ते व सर्वसामान्यांना वापर करता येऊ शकतो.

२.३.१ ग्रामसभा

गाव विकासातील ग्रामसभा हा एक महत्त्वाचा व प्रमुख घटक आहे. गाव विकासासाठी केल्या जाणाऱ्या नियोजन व निर्णयप्रक्रियेत गावातील जनतेला/नागरिकांना प्रत्यक्ष सहभाग होण्यासाठी एक महत्त्वाची जागा आहे. ग्रामसभेची जरी एक विशिष्ट प्रकारची रचना महत्त्वाची आहे, मात्र लोकांचा सहभाग त्यापेक्षा महत्त्वाचा आहे. ग्रामसभेच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी व प्रशासनातील



पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढवण्यासाठी उपयोग होतो. तसेच लोककल्याणकारी व लोकांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी मदत होते.

२.३.१.१ ग्रामसभा- प्रत्यक्ष लोकशाहीचा मुख्य आधारस्तंभ

प्रातिनिधिक लोकशाहीतील दोषांवर मात करण्यासाठी प्रत्यक्ष लोकशाहीचा पुरस्कार केला पाहिजे. कारण प्रत्यक्ष लोकशाहीत सर्व लोक निर्णय प्रक्रियेबरोबरच राजकीय प्रक्रियेत सहभागी होत असतात. त्यामुळे लोकांच्या इच्छा आकांक्षांना मूर्त स्वरूप प्राप्त होते. लोकांच्या राजकीय प्रक्रियेतील प्रत्यक्ष सहभागामुळे राज्यकर्त्यांवर आपोआप नियंत्रण येते. त्यामुळे ते सत्तेचा दुरुपयोग करू शकत नाहीत. आणि ग्रामसभेच्या माध्यमातून नेमके हेच साध्य होते. ग्रामसभेच्या माध्यमातून प्रत्यक्ष लोकशाहीचा अनुभव घेता येतो.

मर्यादित प्रमाणावर का असेना प्रत्यक्ष लोकशाहीचा प्रयोग करता येऊ शकतो याचे एक उदाहरण म्हणजे ग्रामपातळीवरील ग्रामसभा हे आहे. ग्रामसभेत गावातील प्रौढ नागरिकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करून घेता येते. ग्रामसभेच्या बैठकीत सर्व लोक आपल्या प्रतिनिधींना म्हणजे ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना जाब विचारू शकतात. त्यांच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण करू शकतात. तसेच त्यांना निरनिराळी लोकोपयोगी किंवा विकासकामे करण्याविषयी मार्गदर्शन करू शकतात.

गडचिरोली जिल्ह्यातील मेंढालेखा या गावाने गावाची ग्रामसभा सर्वोच्च मानून गावविकासाचे निर्णय घेतले व त्याची योग्य तऱ्हेने अंमलबजावणी केली. यात गावातील सर्व लोकांनी पुढाकार घेतला. तसेच अहमदनगर जिल्ह्यातील हिवरेबाजार गावाचीही कथा आपणास माहितीच आहे. ही दोन्ही गाव 'आदर्श गाव' म्हणून नावारूपाला येण्यामध्ये त्या गावातील लोक आणि ग्रामसभांचा मोठा वाटा आहे.

२.३.१.२. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८

महाराष्ट्रात ग्रामसभेला सर्वोच्च मानून त्याची गावपातळीवर योग्य व प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अंतर्गत विशेष तरतूद करण्यात आली आहे. या अधिनियमाच्या कलम ८ अ. नुसार ग्रामसभेचे अधिकार व कर्तव्य दिली आहेत.

२.३.१.२.१ ग्रामसभेचे अधिकार व कर्तव्य-

कलम ८ अ नुसार प्रत्येक ग्रामसभा-

१. पंचायतीकडून राबवण्यात येतील अशा सामाजिक किंवा आर्थिक विकासाच्या योजना, कार्यक्रम व प्रकल्प यांना अशा योजना, कार्यक्रम व प्रकल्प यांच्या अंमलबजावणीचे काम त्या पंचायतीने हाती घेण्यापूर्वी, मान्यता देणे यासाठी सक्षम असेल.

२. विकास योजनांवर कोणताही खर्च करण्याची पंचायतीला परवानगी देणे यासाठी सक्षम असेल.

कलम ४५ नुसार गावातील रहिवाशांचे आरोग्य सुस्थितीत राहण्यासाठी ग्रामसभेच्या मान्यतेने गावात त्यासंबंधीचे कोणतेही काम किंवा योजना राबवता येऊ शकते. तसेच ग्रामसभेला पंचायत व ग्रामपंचायत स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या समित्यांचे पर्यवेक्षण, नियंत्रण आणि कार्यपद्धतीचे नियमन करण्याचा अधिकार आहे.

दिनांक ६ डिसेंबर २००६ च्या शासन निर्णयानुसार ग्रामस्तरावरील ग्राम, आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती ग्रामपंचायतीच्या हद्दीतील सर्व गावे, वाड्या, वस्त्या व पाड्यांवर कार्यरत राहिल. या समितीने कर्तव्य आणि जबाबदारी म्हणून, ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती करणे; पाणीपुरवठा योजनेची अंमलबजावणी करणे; ग्रामपंचायत हद्दीतील स्वच्छता आणि कुटुंब कल्याण व पोषण कार्यक्रम राबवणे, तसेच गावपातळीवर आरोग्य व पोषण विषयक सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर देखरेख करावी व गावपातळीवर सर्वांना सेवा मिळतील यासाठी कार्यरत राहणे.

कलम ७ नुसार ग्रामसभेची बैठक आयोजित करण्यात येते. या ग्रामसभेच्या बैठकीमध्ये पोटकलम ६ प्रमाणे गावात काम करीत असलेल्या शासकीय, निमशासकीय व पंचायतीच्या कर्मचाऱ्यांवर तसेच त्यांच्या कार्यालयातील उपस्थितीवर ग्रामसभेचे शिस्तविषयक नियंत्रण असेल. तसेच अशा कर्मचाऱ्यांच्या कामाचे वार्षिक मूल्यमापन ग्रामसभेकडून करून त्यांच्या वरिष्ठांच्या निदर्शनास आणले जाईल.

तर पोटकलम ७ नुसार एखाद्या कर्मचाऱ्याकडून नियमबाह्य वर्तन घडल्यास ग्रामसभा योग्य कार्यवाहीसाठी गट विकास अधिकाऱ्याला अहवाल देईल.

तसेच पोटकलम १० नुसार गावात काम करणाऱ्या शासकीय निमशासकीय आणि पंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी ग्रामसभेला उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

२.३.१.२.२ ग्रामसूची

गाव पातळीवरील विषयांसंबंधी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या अनुसूची एकमध्ये ग्रामसूची दिलेली आहे. या अनुसूचीतील ७८ विषयांची विभागणी खालील १२ भागात केलेली आहे.

१. कृषी २. पशुसंवर्धन ३. वने ४. समाजकल्याण ५. शिक्षण ६ वैद्यकीय आणि आरोग्य ७. इमारती व दळणवळण ८. पाटबंधारे ९. उद्योगधंदे व कुटीर उद्योग १०. सहकार ११. स्वसंरक्षण व ग्रामसंरक्षण १२. सामान्य प्रशासन

वैद्यकीय आणि आरोग्य विषयक ग्रामसूची

वैद्यकीय आणि आरोग्यविषयक ग्रामसूचीमध्ये पुढील गोष्टींचा सहभाग होतो-

वैद्यकीय मदतीची तरतूद करणे; प्रसूती आणि शिशु कल्याण; आरोग्य रक्षण व सुधारणा;

कोणत्याही संक्रमक रोगाचा उद्रेक, फैलाव किंवा पुनरुद्भाव होण्यास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणे, माणसांना व प्राण्यांना देवी प्रतिबंधात्मक लस टोचण्यास उत्तेजन देणे; चहा, कॉफी व दुधाच्या दुकानाचे नियमन करणे, सार्वजनिक रस्ते, गटारे, बांध, तळी व विहिरी आणि इतर सार्वजनिक जागा किंवा बांधकामे स्वच्छ करणे; आरोग्य विघातक वस्त्यांची सुधारणा करणे; केरकचरा, माजलेले रान, काटेरी निवडुंग काढून टाकणे; वापरात नसलेल्या विहिरी, आरोग्यास अपायकारक तळी, डबकी, खंदक, खड्डे, खाचखळगे भरून काढणे, पाठबंधाऱ्याच्या क्षेत्रात पाणी साचण्यास प्रतिबंध करणे आणि इतर संरक्षणविषयक सुधारणा करणे; सार्वजनिक शौचालये बांधणे व ते सुस्थितीत राखणे; स्वच्छता, साफसफाई, उपद्रव होऊ न देणे व तो कमी करणे व बेवारशी प्रेतांची व मेलेल्या जनावरांची विल्हेवाट लावणे; घरगुती उपयोगासाठी व जनावरांसाठी पाण्याचा पुरवठा करणे; गुरांना पाणीपुरवठा करण्याकरिता तळी खणणे, ती स्वच्छ करणे व सुस्थितीत राखणे; ज्याची कोणत्याही प्राधिकरणाकडून व्यवस्था ठेवण्यात येत नसेल अशा स्नानाच्या व धुण्याच्या घाटांची व्यवस्था ठेवणे व त्यावर नियंत्रण ठेवणे; दहनभूमी व दफनभूमी यांची तरतूद करणे, त्या सुस्थितीत राखणे व त्यांचे निरसन करणे.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील आरोग्य विषयक तरतुदींनुसार ग्रामसभा गावातील आरोग्याशी संबंधित मुद्यांवर देखरेख करू शकतात. तसेच गाव पातळीवरील नियोजनात सहभागी होण्याचा अधिकारही ग्रामसभेच्या माध्यमातून सर्व जनतेला मिळाला आहे.

२.३.१.३ ग्रामसभेची वैशिष्ट्ये

निर्णयप्रक्रियेत लोकांचा प्रत्यक्ष सहभाग

- ग्रामसभेच्या माध्यमातून शासकीय कार्यालये व खाजगी संस्थांवर ग्रामसभेचे नियंत्रण.
- गावविकासाचे सर्व निर्णय ग्रामसभेत घेतले जातात.
- ग्रामसभेला पंचायतीने केलेल्या खर्चाचे हिशोब घेणे व खर्चाला मान्यता देण्याचा अधिकार आहे.
- गावात होणाऱ्या विकासकामांवर देखरेख ठेवण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे.
- आपल्या भागातील स्थानिक जनतेला भेडसावणारे प्रश्न ग्रामसभेत उपस्थित करणे व ते सोडवण्यासाठी निर्णय घेणे.
- विविध योजनांच्या लाभार्थ्यांची प्रत्यक्ष लोकांच्या उपस्थितीत ग्रामसभेतून निवड करणे.
- गावपातळीवर काम करणाऱ्या शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कामाचा आढावा घेणे व त्यानुसार नियोजन करणे.

२.३.१.४ ग्रामसभेत कोणत्या मुद्यांवर चर्चा करून निर्णय घेऊ शकतो

- गावात राबवल्या जाणाऱ्या वैयक्तिक व सार्वजनिक लाभाच्या, तसेच गाव विकासाच्या विविध योजनांचा आढावा घेणे, नियोजन करणे व त्याबाबत निर्णय घेणे.
- गावातील विकासकामांचा आढावा घेणे, येणाऱ्या निधीचे योग्य नियोजन व विनियोग करणे व खर्चाचा आढावा घेणे.
- गावातील आरोग्यसेवांमध्ये सुधारणा होण्यासाठी उपाययोजना सुचवणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवणे व गावातील आरोग्यसेवांचे नियोजन करणे.

- गावातील अंगणवाडी सेवांवर देखरेख करणे व कुपोषण कमी करण्यासाठी गावपातळीवर उपाययोजना करणे/सुचवणे.
- गावात देण्यात येणाऱ्या आरोग्यसेवांचा आढावा घेणे, सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या (उदा- आशा, नर्सताई, आरोग्य सेवक) कामाचा आढावा घेणे, व त्याबाबत संबंधितांना सूचना देणे.

- गाव आरोग्य समितीला येणाऱ्या अबंधित निधीचे नियोजन सर्वांसमोर करू शकतो. शिवाय नियोजनानुसार खर्च होत आहेत की नाही यावर देखरेख व पाठपुरावा करणे सहज शक्य होईल. तसेच गावातील आरोग्यावर झालेल्या खर्चाचा तपशील गावबैठकीत मांडू शकतो.

- चांगले रेशन, पिण्यासाठी शुद्ध पाणी, रहदारीसाठी रस्ता, कचरापेटी या सेवा उपलब्ध नसतील तर त्या मिळवण्यासाठी ग्रामसभेत प्रश्न उपस्थित करता येतील.

२.३.१.५ आरोग्य ग्रामसभा

महाराष्ट्र शासनाने दिनांक २६ जून २०१४ रोजीच्या परिपत्रकाने प्रत्येक गावात आरोग्य ग्रामसभा आयोजित करण्याचे सुचवले आहे. या परिपत्रकानुसार दिनांक २४ एप्रिल ते १ मे (पंचायतराज दिन ते महाराष्ट्र दिन) या कालावधीत ग्रामसभा आयोजित करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. यामध्ये जनजागृतीपासून गावातील आरोग्यसेवांचा आढावा घेणे, प्रतिबंधात्मक सेवांचे नियोजन करणे, गावपातळीवर मिळणाऱ्या निधीचे योग्य नियोजन करण्याबाबत सुचवण्यात आले आहे. या परिपत्रकाचा वापर करून आपण आपल्या भागात आरोग्यसेवांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण पुढाकार घेऊ शकता.

आपल्या माहितीसाठी आरोग्य ग्रामसभेचे परिपत्रक दिले आहे. (परिशिष्ट क्रमांक १ पाहा पान नं. ५१)

२.३.२ आमसभा

ज्याप्रमाणे गावपातळीवरील विविध प्रश्न सोडवण्यासाठी किंवा गावाच्या विकासाचे नियोजन करण्यासाठी ग्रामसभा आयोजित करण्यात येते. त्याचप्रमाणे तालुक्यातील सर्व गावांतील महत्त्वाचे मुद्दे/प्रश्न/समस्या सोडवण्यासाठी किंवा तालुका स्तरावरील महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी आमसभेचे आयोजन केले जाते. ही आमसभा वर्षातून एकदा आयोजित केली जाते. या आमसभेसाठी तालुक्यातील सर्व पंचायतराज संस्थांचे सदस्य (ग्रामपंचायत, पंचायत समिती सदस्य व जिल्हा परिषद सदस्य) व त्या तालुक्यातील आमदार किंवा खासदार उपस्थित असतात. आमसभेमध्येही नागरिक आपले प्रश्न लोकप्रतिनिधी व संबंधित प्रशासकीय अधिकारी यांच्यासमोर उपस्थित करतात. या उपस्थित मुद्यांवर आमसभेत चर्चा करून निर्णय घेतले जातात.

२.३.३ माहितीचा अधिकार



भारताच्या राज्यघटनेनुसार भारतीय नागरिकांनी भारत हे लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून घोषित केले आहे. हा उद्देश साध्य करण्यासाठी राज्यघटनेने कार्यकारी मंडळ, विधिमंडळ व न्यायमंडळ या संस्थात्मक संरचनेची निर्मिती केली आहे.

राज्यघटनेने त्यासाठी नागरिकांना अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य

मूलभूत हक्क म्हणून बहाल केले आहे. अर्थात नागरिकांना त्यांचे महत्त्वपूर्ण मत मांडण्यासाठी शासनाच्या कार्यपद्धतीची माहिती व सार्वजनिक हिताच्या बाबी कशा हाताळल्या जातात याची माहिती मिळणे आवश्यक आहे. ही माहिती नागरिकांना प्राप्त व्हावी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू करण्यामागील मुख्य उद्देश आहे. हा कायदा देशात ५ ऑक्टोबर २००५ पासून अंमलात आला आहे. माहितीच्या अधिकार अधिनियमांतर्गत नागरिकांना वैयक्तिक माहितीबरोबरच सार्वजनिक हिताचीही माहिती मागवता येते. त्यामुळे शासकीय कमकाजात काही प्रमाणात का होईना पण पारदर्शकता येण्यास मदत होते. माहितीच्या अधिकारामुळे जागरूकता व प्रगल्भ नागरिक होण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. या अधिनियमामुळे लोकशाही सामान्य माणसांच्या दारात आली आहे. माहिती प्राप्त करण्याच्या दृष्टीने नागरिक म्हणून लोकसभेच्या/विधानमंडळाच्या सदस्यांइतकेच माहिती विचारण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत. या अधिकारामुळे कार्यालयीन गोपनियतेचे वातावरण दूर करता येईल. तसेच शासकीय यंत्रणेस ते करीत असलेल्या कामांबद्दल उत्तरदायी ठरविता येईल.

२.३.३.१ कोणत्या प्रकारची माहिती विचारू शकतो

- शासकीय विभाग कशी कामे करतात, कोणत्या कार्यपद्धती अवलंबितात आणि जनतेस कशाप्रकारे सेवा देतात हे त्या विभागाने स्वतःहून सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रकाशित करावे.
- वेगवेगळ्या खात्याच्या न्यायालयीन, प्रशासकीय विभागांच्या फाईल्सचे निरीक्षण करू शकतात.
- परिसरात चालू असलेल्या विकासकामांची माहिती मिळवू शकतो.
- स्वस्त धान्य दुकानातील उपलब्ध धान्य साठा.
- शासकीय रुग्णालयातील सेवा-सुविधा व उपलब्ध औषध साठा.
- विविध शासकीय योजनांतील लाभार्थींची माहिती, निवड, निकष.

२.३.३.२ कोणत्या स्वरूपातील माहिती आपणांस मागवता येते-

जी माहिती सार्वजनिक प्राधिकरणाकडे किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली माहिती मिळवण्याचा अधिकार सर्व नागरिकांना आहे. ही माहिती खालील स्वरुपामध्ये आपण मागवू शकता किंवा माहितीची पाहणी करू शकता-

- एखादे काम, दस्ताऐवज, अभिलेखे यांची पाहणी
- दस्ताऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रति

- सामग्रीचे प्रमाणित नमुने
- इलेक्ट्रॉनिक किंवा इतर कोणत्याही प्रकारात साठवलेली माहिती

२.३.३.३ माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील काही महत्त्वाच्या तरतुदी-

- कलम ४ (१) - सर्व माहिती लोकांना माहितीच्या अधिकारात उपलब्ध होईल अशी तयार करून ठेवणे.

- कलम ४ (२) - माहिती मिळण्यासाठी लोकांना अधिनियमाचा कमीत कमी आधार घ्यावा लागावा यासाठी, नियमित कालांतराने लोकांना इंटरनेटसह, संपर्काच्या विविध साधनांद्वारे, स्वतःहून माहिती पुरवण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिल.

- कलम ४ (३) - प्रत्येक माहिती विस्तृत प्रमाणात आणि लोकांना सहजपणे उपलब्ध होईल अशा स्वरूपात आणि अशा रीतीने प्रसारित करण्यात येईल.

- कलम ७ (१) - ३० दिवसाच्या आत अर्ज निकाली काढणे व एखाद्या व्यक्तीच्या जीवित किंवा स्वातंत्र्यासंबंधित माहिती ४८ तासात देणे बंधनकारक आहे.

- कलम ८ - जी माहिती जीवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेच्या, भारताच्या सार्वभौमत्वाला, सुरक्षिततेला धोका तयार होईल अशी माहिती देण्यास नकार.

- कलम २० (१) - विहित कालावधीत माहिती देण्यास नकार, टाळाटाळ केली तर अपिलीय अधिकारी संबंधित जन माहिती अधिकाऱ्यास प्रति दिवस २५० रु. इतका दंड ठोठवू शकतात. जास्तीत जास्त रक्कम २५,००० रु. पर्यंत.

माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत आपण आवश्यक माहितीची पाहणीही करू शकतो. यासाठी संबंधित अधिकाऱ्याकडे रीतसर अर्ज करणे आवश्यक आहे.

तुम्ही विचारलेली माहिती त्या विभागाशी संबंधित नसेल. त्या विभागाने योग्य विभागाकडे ५ दिवसात अर्ज पाठवायचा असतो व तसे अर्जदाराला कळवण्यात यावे.



२.३.३.४ माहिती व अपिलीय अधिकाऱ्यांची रचना

केंद्रीय माहिती आयुक्त

↓

राज्य माहिती आयुक्त

↓

जिल्हा माहिती आयुक्त

↓

द्वितीय अपिलीय अधिकारी

↓

प्रथम अपिलीय अधिकारी

↓

जन माहिती अधिकारी

२.३.३.५ माहिती अधिकाराखाली माहिती कशी मागवायची?

माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागवताना आपण ज्या विभागाची माहिती मागवायची आहे तेथील जन माहिती अधिकारी यांच्या नावाने एक अर्ज करणे अपेक्षित आहे. अर्ज केल्यानंतर आपण मागवलेली माहिती संबंधित अधिकाऱ्याने ३० दिवसाच्या आत देणे बंधनकारक असते. जर आपणास ३० दिवसात माहिती मिळाली नाही, तर आपण अपिलीय अधिकारी यांच्याकडे रितसर अर्ज करू शकता.

माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करताना अर्जाची फी रुपये १०/- रोखीने, चेकने, डिमांड ड्राफ्टने किंवा १० रु. चे कोर्ट फी स्टॅम्प लावून भरायचे आहे. माहिती मागवताना एका अर्जात एकाच विभागासंबंधी प्रश्न विचारावेत, जेणेकरून संबंधित अर्जावर माहिती अधिकाऱ्यास लवकर कार्यवाही करता येईल.

२.३.३.६ माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळवण्यासाठीच्या अर्जाचा नमुना

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

जोडपत्र - अ

१० रु.चे कोर्ट फी स्टॅम्प

प्रति,

जन माहिती अधिकारी,

(कार्यालयाचे नाव व पत्ता)

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव-

२. पत्ता-

३. हव्या असलेल्या माहितीचा तपशील-

- माहितीचा विषय-
- ज्या कालावधीतील माहिती आहे तो कालावधी
- हव्या असलेल्या माहितीचे वर्णन
- माहिती टपालाद्वारे हवी की व्यक्तीशः
- टपालाद्वारे हवी असल्यास (सर्वसाधारण, रजिस्टर किंवा स्पीड पोस्टने)

४. अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा कसे?

(असल्यास, त्याबाबतच्या पुराव्याची छायांकित प्रत जोडावी)

ठिकाण-

दिनांक- अर्जदाराची सही

२.३.३.७. माहिती वेळेत उपलब्ध न झाल्यास अपील करण्याचा अधिकार-

आपण माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत माहिती मिळण्यासाठी अर्ज केला आणि आपणांस माहिती अधिकाऱ्यांनी कायद्याने ठरवून दिलेल्या कालावधीत माहिती उपलब्ध करून न दिल्यास अपिलीय अधिकाऱ्याकडे आपण ठराविक कालावधीत अपील करू शकता. तसेच तुम्हाला दिलेली माहिती खोटी असल्यास किंवा दिशाभूल करणारी असल्यास त्याविरोधातही अपील करता येते. माहिती मिळण्याच्या अपेक्षित कालावधीपासून किंवा माहिती मिळाल्याच्या कालावधीपासून ठराविक कालावधीत अपील करावे लागते. अपील करण्याचा कालावधी पुढीलप्रमाणे-

- जन माहिती अधिकारी - ३० दिवस
- प्रथम अपील - माहिती मिळाल्याच्या दिवसापासून किंवा मिळणे अपेक्षित होते त्या तारखेपासून ३० दिवसात
- दुसरे अपील - माहिती मिळाल्याच्या दिवसापासून किंवा मिळणे अपेक्षित होते त्या तारखेपासून ३० ते ४५ दिवसात
- तिसरे अपील - माहिती मिळाल्याच्या दिवसापासून किंवा मिळणे अपेक्षित होते त्या तारखेपासून ९० दिवसात

२.३.३.८ माहिती मिळवण्यासाठी भरावी लागणारी फी-

- अर्ज करताना १० रु. कोर्ट स्टॅम्प तिकीट
- प्रति पान - २ रु.
- प्रति सी. डी. ५० रु.
- माहितीची पाहणी करणे - प्रत्येक तासाला ५ रु. दारिद्र्य रेषेखालील व्यक्तीस मोफत माहिती

२.३.४ सोशल ऑडिट (सामाजिक अकेंक्षण)

चार्टर्ड अकाऊंटद्वारा केले जाणारे संस्थांचे लेखा व्यवहारांचे (अकाऊंट) ऑडिट आपल्याला परिचयाचे आहे. 'स्टँडर्ड अकाऊंटिंग प्रोसिजर' आधारे संस्थेने केलेला लेखा व्यवहार योग्य/अयोग्य, त्रुटीपूर्ण, सदोष होता का हे तपासले जाते. लेखा व्यवहारांशी संबंधित ठराव उदा. वस्तु खरेदीचा ठराव, खर्च मान्यतेचा ठराव इत्यादीसुद्धा तपासले जाते. शेवटी संस्थेच्या लेखा व्यवहारांचे ताळेबंद (बॅलेन्स शीट) तयार केले जाते. ज्याद्वारे आपल्याला त्या संस्थेची मालमत्ता (असेटस्) आणि देयक (लायबिलिटीज) समजते.

मात्र ज्या विशिष्ट सामाजिक हेतुच्या पूर्ततेसाठी ठरावीक काम सुरू करण्यात आलेले होते त्या हेतुच्या पूर्ततेची तपासणी चार्टर्ड अकाऊंटच्या ऑडिटमधून होत नाही. उदा. दुष्काळग्रस्त अल्पभूधारक शेतकरी आणि सर्वसाधारण शेतमजूर यांना तातडीची मदत व्हावी, दुष्काळ निवारणासाठी दीर्घ पल्ल्याची सार्वजनिक तत्त्व तयार व्हावी या चांगल्या हेतुने त्या भागात रोजगार हमी योजनेची कामे उपलब्ध करून देण्यात आली. सदर योजनेचे चार्टर्ड अकाऊंटकडून ऑडिट करवून घेतले तर आपल्याला खर्च रक्कम, दर माणशी मजुरीची रक्कम, लेखा व्यवहारातील योग्य किंवा अयोग्य व्यवहार्य आदि उघडकीस येतील. परंतु ज्या हेतुंनी आपण ही योजना सुरू केली त्या हेतुंच्या पूर्ततेबद्दल फारसे काही समजणार नाही.

याच अडचणीवर मात करण्यासाठी सोशल ऑडिटची पद्धत अस्तित्वात आली. यात लेखा व्यवहारांसोबतच सामाजिक हेतू पूर्ततेचा दर्जा तपासला जातो. वरील उदाहरणात मजुरी मिळालेले लोक नेमके अल्पभूधारक शेतकरी होते की अन्य कोणी होते? शेतमजूर किती होते? दुष्काळ निवारण्यासाठी तलाव आदि किती सार्वजनिक **मत्ता** तयार झाली. त्याचा प्रत्यक्ष लाभ किती लोकांना झाला इत्यादी गोष्टी तपासल्या जातात.

प्रत्यक्ष योजनेचे लाभार्थी लोकांना प्रशिक्षण देऊन स्पेशल ऑडिट घडवून आणले जाते.

स्वयंसाहाय्यता समूह प्रत्यक्ष लोकशाहीचे मॉडेल

स्वयंसाहाय्यता समूह (बचत गट) मध्ये बचतीची रक्कम, व्याजाची रक्कम आदि निर्णय कोणी घेतले होते? या निर्णयाचा मसुदा कोणी बनविला? निर्णयाची अंमलबजावणी कोण करतो? अंमलबजावणीवर देखरेख कोण ठेवतो? बचतीची किंवा व्याजाची रक्कम जास्त असल्याचे लक्षात आल्यास या चुकीची दुरुस्ती कोण करतो? अशा सर्व प्रश्नांचे उत्तर बचत गटातील सदस्य काय देतील... "आम्ही" निर्णयाच्या प्रत्येक पातळीवर सदस्यांचा पूर्ण सहभाग व सक्रिय योगदान हे स्वयंसाहाय्यता समुहाचे वैशिष्ट्य आहे. प्रत्यक्ष लोकशाहीचे ते आपल्याला सर्वात जवळचे परिचित उदाहरण आहे.

जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडे जनतेचा पैसा कराच्या रूपाने जमा होतो. शासन तोच पैसा समाजाला विविध कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून परत करते. परंतु समाजाच्या विकासाकरता दिलेला पैसा पुरेशा प्रमाणात ठरवलेल्या कामासाठी वापरला जातो की नाही? त्या पैशाचा कसा वापर केला जातो? याबाबत समाज प्रश्न विचारू शकतो. लोकशाही शासनव्यवस्थेत प्रत्यक्ष लोकांचा सहभाग खूप महत्त्वाचा आहे. सद्यःस्थितिमध्ये समाजामध्ये आपल्या प्रशासनाला, अधिकाऱ्यांना किंवा लोकाप्रतिनिधींना प्रश्न विचारण्याची जागरूकता नाही किंवा कमी आहे. त्यामुळे

लोकांचे हक्क तर लोकांना मिळत नाहीतच, यातूनच भ्रष्टाचारासाठी वाव मिळतो. सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने ही स्थिती बदलणे आवश्यक आहे.

आपण आपल्या घरातील घरखर्चाचे ऑडिट करतो/हिशोब ठेवतो, तर मग सरकारी कामाचे ऑडिट का होत नाही? त्यासाठी आपण सामाजिक अकेंक्षणासारखी पद्धत वापरून गावपातळीवर सरकारकडून केल्या जाणाऱ्या कामाचे ऑडिट करता येते. सरकारी कामाचे ऑडिट करणे म्हणजे केवळ चुका काढणे, असा त्याचा अर्थ नाही. परंतु यातून प्रशासनाची कार्यक्षमता वाढते, तर विविध विकासकामांमध्ये लोकांचाही सहभाग वाढतो. परंतु आपले हक्क व कर्तव्यांची जाणीव ठेवून गावात प्रत्येक योजनेचे सामाजिक अकेंक्षण करणे गरजेचे आहे.

२.३.४.१ सामाजिक अंकेक्षण म्हणजे काय?

सामाजिक अंकेक्षण हे एक मोजमाप करण्याचे, समजून घेण्याचे, पडताळणी करण्याचे, लोकांना अहवाल देण्याचे आणि त्या गोष्टीत सुधारणा करण्याचे तंत्र व कामात किंवा योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता वाढवण्याचा मार्ग आहे. सामाजिक अंकेक्षण हे ठरवलेली उद्दिष्ट्ये, हेतू आणि प्रत्यक्ष परिस्थिती यातील दरी कमी करण्यास मदत करते. तसेच स्थानिक प्रशासनात सुधारणा करण्यासाठी विशेषतः स्थानिक पातळीवरील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठीचे एक चांगले साधन आहे.

२.३.४.२ सामाजिक अंकेक्षणाचा हेतू



- स्थानिक पातळीवरील प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवणे.
- विकासाच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय, कृती कार्यक्रम आणि प्रत्यक्षातील स्थितीची पडताळणी करणे.
- विकासासाठी निर्माण केलेली संसाधने व त्यांची उपयोगिता शोधणे.
- विकासकामांमध्ये प्रशासनाची कार्यक्षमता व लोकांचा सहभाग वाढवणे.
- लोक कल्याणकारी योजनांबद्दल त्याचे लाभार्थी आणि लाभ देणारे यांच्यात जागृती निर्माण करणे.
- स्थानिक विकासाच्या कार्यक्रमांचे महत्त्व आणि परिणाम कारकता वाढवणे.

२.३.४.३ सामाजिक अंकेक्षण करण्याची कारणे

- प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये जनतेप्रती पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवणे
- सामूहिक निर्णयप्रक्रियेला प्रोत्साहन देणे.
- काय घडत आहे हे समजण्यासाठी लोकांची मते आणि त्यांच्या अपेक्षा जाणून घेणे.
- आपण काय मिळवू शकतो याची लोकांना जाणीव करून देणे.
- विश्वासार्हता वाढवणे.

२.३.४.४ सामाजिक अंकेक्षणाचे टप्पे

- सामाजिक अंकेक्षण करण्याचे ठरवणे.
- विषयांची क्रमवारी निश्चित करून विषय ठरवणे.
- सामाजिक अंकेक्षणाची उद्दिष्ट्ये ठरवणे.
- सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेतील सहभागी ठरवणे.
- मूल्यांकनाचे मापदंड (Indicators) ठरवणे.
- माहिती जमा करण्याची प्रक्रिया विकसित करणे.
- माहिती जमा करणे आणि त्याचे विश्लेषण करणे.
- मिळालेल्या माहितीची नागरिकांसमोर मांडणी करणे आणि त्याची पडताळणी करणे.
- निघालेल्या निष्कर्षानुसार कृती कार्यक्रम ठरवणे.

२.३.४.५ सामाजिक अंकेक्षणाची तत्त्वे

- सामाजिक अंकेक्षणासाठी संबंधितांची परवानगी घेणे.
- माहितीच्या स्त्रोतांबद्दल गुप्तता पाळणे.
- मिळालेल्या माहितीची पडताळणी करणे.
- निघालेले निष्कर्ष लोकांसमोर मांडण्यात येणार असल्याची खात्री देणे.
- मिळालेल्या निष्कर्षानुसार समोर आलेले प्रश्न सोडवण्यासाठी स्थानिक लोकांच्या सूचना घेणे.

२.३.४.६ सामाजिक अंकेक्षणासाठी आवश्यक दस्ताऐवज

- कार्यक्रमाचे अहवाल, ग्रामसभा किंवा विविध बैठकांत झालेल्या निर्णयांचे ठराव.
- आवश्यकता असल्यास खर्चाच्या नोंद वह्या, पावत्या, बँकेचे पासबुक, इ.
- लाभ घेतलेल्या लाभार्थींच्या याद्या.
- सामाजिक अंकेक्षणादरम्यान तयार केलेला अहवाल.

२.३.४.७ सामाजिक अंकेक्षणातील सहभागी

- योजना राबवणारे अधिकारी-कर्मचारी
- योजनेचे प्रत्यक्ष लाभार्थी
- स्थानिक लोकप्रतिनिधी
- स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी

- इतर संबंधित विभागाचे अधिकारी
- संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी
- स्वयंसेवी संस्था-संघटनांचे प्रतिनिधी

२.३.४.८ सामाजिक अंकेक्षणाचे फायदे

- समुदायाला सहभागी नियोजनासाठी प्रशिक्षित करणे.
- स्थानिक लोकशाहीला उत्तेजन देणे.
- सामूहिक निर्णयासाठी प्रोत्साहन देणे
- विकासकार्यात लोकसहभागाला उत्तेजन देणे.
- योग्य लाभार्थींना किंवा गरजूंना लाभ मिळण्यासाठी प्रयत्न करणे.



२.३.४.९ रोजगार हमी योजनेचे सोशल ऑडिट

रोजगार हमी योजनेमध्ये सरकारनेच शासन निर्णय घेऊन या योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचे सोशल ऑडिट करण्याची तरतूद केलेली आहे. याबाबत शासनाच्या परिपत्रकाचा आधार घेऊन आपण आपल्या भागात रोजगार हमी योजनेच्या कामाचे सोशल ऑडिट करू शकता.

२.३.५ जनसंवाद/जनसुनवाई

(सूचना- जनसंवाद/जनसुनवाई बाबत सविस्तर माहितीसाठी 'प्रशिक्षण पुस्तिका क्र.२- आरोग्यसेवांच्या उत्तरदायित्वासाठी लोकाधारित देखरेख संकल्पना' बघावे.)

२.३.६ सेवा हमी कायदा

सरकारी काम म्हटलं की सामान्य माणसाच्या अंगावर काटा उभा राहतो. कारण 'सरकारी काम अन् दहा महिने थांब' या म्हणीप्रमाणे सगळे कामकाज चाललेले असते. कोणत्याही साध्या कामासाठी किंवा साधा एखादा दाखला मिळवायचा म्हटला तरी सामान्य नागरिकांना महिनो न् महिने सरकारी कार्यालयात खेपा माराव्या लागतात. त्यात अजून चिरीमिरी दिल्याशिवाय फाईल पुढे सरकत नाही. हा आपला नेहमीचा अनुभव आहे.

ही परिस्थिती लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने राज्यात १ जुलै २०१५ पासून 'सेवा हमी कायदा' अंमलात आणला आहे. सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जनण्यातील शासनाशी संबंधित लहानसहान कामे तत्परतेने व्हावीत आणि भ्रष्टाचाराला आळा बसावा, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये नागरिकांना त्यांची दाखले व इतर कागदपत्रे ठराविक वेळेत मिळण्याची खात्री दिलेली आहे. या अध्यादेशातील तरतुदीनुसार विविध शासकीय विभागांनी, कार्यालयांनी देण्यात येणाऱ्या सेवा, त्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे, सेवापूर्तीचा कालावधी, आकारण्यात येणारे शुल्क, अंमलबजावणी करणारा अधिकारी यांची माहिती जाहीर करणे आवश्यक आहे. तसेच यामध्ये काही अडचणी आल्यास किंवा अडवणूक झाल्यास नागरिक त्याविरुद्ध तक्रार नोंदवू शकतात. त्यासाठी प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांचीही माहिती जाहीर करणे बंधनकारक आहे. या अध्यादेशाचा आधार घेऊन आपल्याला आपल्या भागातील सेवांमध्ये सुधारणा घडवून आणता येतील.

२.४ थोडक्यात पण महत्त्वाचे

- प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये जनतेचा सहभाग घेण्यासाठीचे विविध मार्ग- ग्रामसभा, आमसभा, माहितीचा अधिकार, सामाजिक अकेंक्षण (सोशल ऑडिट), जनसंवाद/जनसुनवाई, सेवा हमी कायदा.
- ग्रामसभेच्या माध्यमातून लोकसहभागाने लोकप्रतिनिधी व प्रशासनातील पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढवण्यासाठी उपयोग होतो. तसेच लोककल्याणकारी व लोकांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी मदत होते.
- ग्रामसभेसारख्या माध्यमातून प्रत्यक्ष लोकशाहीत सर्व लोक निर्णय प्रक्रियेबरोबरच राजकीय प्रक्रियेत सहभागी होत असतात. त्यामुळे लोकांच्या इच्छा आकांक्षांना मूर्त स्वरूप प्राप्त होते. लोकांच्या राजकीय प्रक्रियेतील प्रत्यक्ष सहभागामुळे राज्यकर्त्यांवर आपोआप नियंत्रण येते. त्यामुळे ते सत्तेचा दुरुपयोग करू शकत नाहीत.
- ग्रामसभेच्या बैठकीत सर्व लोक आपल्या प्रतिनिधींना म्हणजे ग्रामपंचायतीच्या
- पदाधिकाऱ्यांना जाब विचारू शकतात. त्यांच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण करू शकतात. तसेच त्यांना निरनिराळी लोकोपयोगी किंवा विकासकामे करण्याविषयी मार्गदर्शन करू शकतात.
- राज्यघटनेने नागरिकांना अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य मूलभूत हक्क म्हणून बहाल केले आहे. नागरिकांना त्यांचे महत्त्वपूर्ण मत मांडण्यासाठी शासनाच्या कार्यपद्धतीची माहिती व सार्वजनिक हिताच्या बाबी कशा हाताळल्या जातात याची माहिती मिळणे आवश्यक आहे. ही माहिती नागरिकांना प्राप्त व्हावी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू करण्यामागील मुख्य उद्देश आहे.
- माहितीच्या अधिकार अधिनियमांतर्गत नागरिकांना वैयक्तिक माहितीबरोबरच सार्वजनिक हिताचीही माहिती मागवता येते. त्यामुळे शासकीय कामकाजात काही प्रमाणात का होईना पण पारदर्शकता येण्यास मदत होते. माहिती प्राप्त

करण्याच्या दृष्टीने नागरिक म्हणून लोकसभेच्या/विधानमंडळाच्या सदस्यांइतकेच माहिती विचारण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत. या अधिकारामुळे कार्यालयीन गोपनियतेचे वातावरण दूर करता येईल. तसेच शासकीय यंत्रणेस ते करीत असलेल्या कामांबद्दल उत्तरदायी ठरविता येईल.

- लोकशाही शासनव्यवस्थेत प्रत्यक्ष लोकांचा सहभाग खूप महत्त्वाचा आहे. सद्यःस्थितिमध्ये समाजामध्ये आपल्या प्रशासनाला, अधिकाऱ्यांना किंवा लोकाप्रतिनिधींना प्रश्न विचारण्याची जागरूकता नाही किंवा कमी आहे. त्यामुळे लोकांचे हक्क तर लोकांना मिळत नाहीतच, यातूनच भ्रष्टाचारासाठी वाव मिळतो.
- सामाजिक अकेंक्षणासारखी पद्धत वापरून गावपातळीवर सरकारकडून केल्या जाणाऱ्या कामाचे ऑडिट करता येते. सरकारी कामाचे ऑडिट करणे म्हणजे केवळ चुका काढणे, असा त्याचा अर्थ नाही. परंतु यातून प्रशासनाची कार्यक्षमता वाढते, तर विविध विकासकामांमध्ये लोकांचाही सहभाग वाढतो.
- सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जनण्यातील शासनाशी संबंधित लहानसहान कामे तत्परतेने व्हावीत आणि भ्रष्टाचाराला आळा बसावा, हा या उद्देशाने १ जुलै २०१५ पासून 'सेवा हमी कायदा' महाराष्ट्रात अस्तित्वात आला आहे. यामध्ये नागरिकांना त्यांची दाखले व इतर कागदपत्रे ठराविक वेळेत मिळण्याची खात्री दिलेली आहे.

२.५ सरावासाठी प्रश्न

२.५.१ ग्रामसभा लोकशाहीचा मुख्य आधारस्तंभ कसा आहे?

२.५.२ ग्रामसभेत कोण-कोणत्या मुद्यांवर चर्चा करता येत?

२.५.३ माहिती अधिकारा अंतर्गत कोणती माहिती विचारू शकतो?

२.५.४ सामाजिक अकेंक्षण (सोशल ऑडिट) म्हणजे काय? व सामाजिक अकेंक्षण का करणे आवश्यक आहे?

२.५.५ सामाजिक अकेंक्षणामध्ये (सोशल ऑडिट) कोणा-कोणाचा सहभाग असावा लागतो?

२.५.६ सेवा हमी कायद्याचा उद्देश काय आहे?

२.५.७ सेवा हमी कायद्यानुसार शासकीय विभागांनी कोणती माहिती जाहीर करणे आवश्यक आहे?

प्रकरण-३

लोकसहभागाचे घटक व लोकाधारित नियोजनाचे महत्त्व

३.१ उद्देश

- **लोकसहभागी आरोग्यसेवांचे नियोजन कसे करता येऊ शकते हे समजणे.**

३.२ कोणता दृष्टिकोन विकसित होईल

आपल्याला निधीच्या नियोजनाविषयी माहिती असेलच मात्र निधीसोबत इतर संसाधनांचेही नियोजन करणे खूप महत्त्वाचे असते. सार्वजनिक आरोग्यसेवांबाबत ते कसे विकसित करता येतील याबाबतचा दृष्टिकोन या प्रकरणातून विकसित होणार.

३.३ नियोजन

अगदी साध्या सोप्या भाषेत सांगायचं म्हटलं तर, कोणतेही काम करायचे असेल तर आपण काही गोष्टी ठरवत असतो आणि त्याप्रमाणे ठरवलेली एक एक गोष्ट पूर्ण करत जातो. या सगळ्यामुळे आपले काम पूर्ण होते. आपण आपल्या रोजच्या जीवनात प्रत्येक वेळी नियोजन करत असतो. संसार चालवण्यासाठी कमाई कशी करायची, आपल्याकडे आलेला पैसा यासाठी कसा वापरायचा हे आपण ठरवत असतो. नोकरदार व्यक्ती दर महिन्याला मिळणाऱ्या पगाराचं नियोजन करते. म्हणजेच आपल्या पगारातली काही रक्कम वेगवेगळी बिलं भरण्यासाठी, किराणा माल व उपयुक्त जिन्नस, दवाखाना, घरपट्टी इत्यादींसाठी काढून ठेवत असतो. यालाच आपण नियोजन म्हणू शकतो. ज्या कामांमध्ये नियोजन नसते ते काम पूर्ण होण्यामध्ये एकतर खूप अडचणी येतात किंवा ते पूर्णच होत नाही. आपण वरचंच उदाहरण बघू. आपल्याला मिळणारी मिळकत/पगार आणि महिन्याभरात ते कसे वापरायचे याचे नियोजन आपण केले नाही आणि कसेही पैसे खर्च केले तर आपले खायचे वांधे

होतील, हे झालं वैयक्तिक पातळीवर. अशाच पद्धतीने मोठ्या प्रमाणात कोणत्याही कामाचे/योजनेचे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही प्रकारचा प्रश्न/समस्या सोडवण्यासाठी नियोजन गरजेचे असते. उदाहरणार्थ, महाराष्ट्र राज्याचे 'आरोग्य खातं' अशाच पद्धतीने वेगवेगळ्या योजना राबविण्यासाठी नियोजन करत असते.

३.३.१ आरोग्याबद्दल आपणकोणत्या गोष्टींचे नियोजन करू शकतो?



३.३.२ नियोजन करणे म्हणजे फक्त पैशाचा जमाखर्च ठरवणे नाही

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आपण फक्त कुटुंबातील पैशाचे नियोजन बघितले. त्याशिवाय पोस्टरमध्ये दर्शवल्याप्रमाणे स्थानिक पातळीवर गाव, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र अशा इतर बऱ्याच ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या नियोजनात आपण सहभागी होऊ शकतो.

- **गावपातळीवरील किंवा आरोग्य केंद्र पातळीवरील नियोजन**

गावाची लोकसंख्या	गावाला मिळणारा अबंधित निधी(रु)
० - ५००	५,०००/-
५०१ -१५००	८,०००/
१५०१ - ५०००	१५,०००/-
५००१ - १००००	२४,०००/-
१०००१	३०,०००/-

शासनाकडून प्रत्येक सार्वजनिक क्षेत्रातील कामांना नियमित वेगवेगळ्या प्रकारे निधी येत असतो. नवनवीन योजना जाहीर केल्या जातात, वरिष्ठ पातळीवर त्यांची अमलबजावणीही होत असते. पण स्थानिक पातळीवरील नियोजना अभावी योजनेचा योग्य उपयोग गावकऱ्यांना होत नाही. उदा. गावपातळीवरील अबंधित निधी. दरवर्षी शासनाकडून तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे प्रत्येक महसुली गावाला अबंधित निधी मिळत असतो.

- **आपण कार्यकर्ता म्हणून अबंधित निधीचे काय करू शकतो -**

कोणत्याही बंधित/अबंधित निधीचे लोकांच्या हिताच्या दृष्टीने खर्चाचे नियोजन उदा. पुणे जिल्ह्यातील वेल्हा तालुक्यात महिलांमधील रक्तपांढरी (ॲनेमिया) कमी करण्यासाठी गावातील अबंधित निधीमधून लोखंडी कढया घेऊन ज्या घरात रक्तपांढरी (ॲनेमिया) असलेली व्यक्ती होती त्या घरात वाटल्या. (लोखंडी कढईत भाजी बनवून खाल्याने रक्तातील लोहाचे प्रमाण वाढते) याप्रमाणे आपल्यालाही गावातील गरजांप्रमाणे नावीन्यपूर्ण उपक्रमांचे नियोजन करता येऊ शकेल.

■ आरोग्य केंद्रांना मिळणाऱ्या रुग्ण कल्याण समिती निधीचे नियोजन -



राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडून प्रत्येक आरोग्य केंद्राला रुग्ण कल्याण समितीच्या नावाने एक निधी आणि आरोग्य केंद्राच्या नियमित खर्चासाठी एक निधी असे दोन प्रकारचे निधी दरवर्षी येतात. त्यापैकी रुग्ण कल्याण निधीचे आरोग्य केंद्रातील रुग्ण कल्याणाच्या दृष्टीने काय गरजा असू शकतील याची प्रत्यक्ष आरोग्य केंद्रात पाहणी आणि रुग्णांशी संवाद, अधिकारी-कर्मचाऱ्यांशी चर्चा यावरून गरजेच्या गोष्टींची यादी तयार करावी. निधीमधून खर्च करावयाच्या वस्तूची यादी समोर ठेवून रुग्ण कल्याण समितीला यादीनुसार खर्चासाठीचे ठराव करायला लावणे. याप्रमाणे आरोग्य केंद्रातील लोकसहभागी नियोजनाचे काही उदाहरणे खालीलप्रमाणे,



ठाणे उपजिल्हा रुग्णालय- रुग्ण कल्याण निधीमधून प्रत्येक वार्डच्या खिडक्यांना जाळ्या बसवून घेण्यासाठी खर्च केला जावा असे सुचविले, रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णाबरोबर त्याच्या एका नातेवाईकास जेवण देण्यात यावे, लोकांच्या या मागणीला धरून जेवण पुरवणाऱ्या कंत्राटदाराबरोबर बैठकी दरम्यान चर्चा करून रुग्णासोबत एका नातेवाईकास जेवण पुरविले जाईल, असे कंत्राटदाराकडून मान्य करून घेतले.

कशेळे ग्रामीण रुग्णालय- रुग्णांच्या वार्डमधील संडास व बाथरूमचे तुटलेले दरवाजे तसेच सतत गळणारे नळ दुरुस्ती आणि वार्डमधील बेडशीटस् स्वच्छ ठेवण्याची व्यवस्था करण्याचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार महिन्याभराच्या आत पोस्टमार्टम रूमची छताची गळती थांबवण्याची व्यवस्था, लाईटची व्यवस्था नळ दुरुस्ती आणि वार्डमधील बेडशीटस् स्वच्छ ठेवण्याची व्यवस्था हा सर्व खर्च २०१५-१६ च्या रुग्ण कल्याण निधीमधून करण्यात आला.

आरोग्य केंद्रांना येणाऱ्या निधीचा तक्ता

क्र.	आरोग्य संस्थेचा प्रकार	रुग्ण कल्याण समिती निधी	वार्षिक देखभाल निधी	अबंधित निधी	एकूण	बँक खाते कोणाच्या नावावर असते?
	उपकेंद्र	-	१०,०००/-	१०,०००/-	२०,०००/-	ए.एन.एम. व सरपंच
	प्रा.आरोग्य पथक	-	१०,०००/-	२५,०००/	३५,०००/-	तालुका वै. अधि. व पथकाचे वै. अधि.
	प्रा.आ.केंद्र	१,००,०००/-	५०,०००/-	२५,०००/	१,७५,०००/-	तालुका वै. अधि. व प्रा. आ. केंद्राचे वै. अधि.
	ग्रामीण रुग्णालय	१,००,०००/	१,००,०००/	५०,०००/	२,५०,०००/-	अधिक्षक, ग्रामीण रु. व त्या रुग्णालयातील ज्येष्ठ वै. अधि.
	उपजिल्हा रुग्णालय	१,००,०००/	१,००,०००/	५०,०००/	२,५०,०००/-	अधिक्षक, उपजिल्हा रु. व त्या रुग्णालयातील ज्येष्ठ वै. अधि.
	जिल्हा रुग्णालय	५,००,०००	५,००,०००	-	१०,००,०००	जिल्हा शल्यचिकित्सक व निवासी वैद्यकीय अधिकारी (क्लिनिकल)
	स्त्री रुग्णालय	१,००,०००/-	१,००,०००/-	५०,०००/-	२,५०,०००/-	अधिक्षक, स्त्री रु. व त्या रुग्णालयातील ज्येष्ठ वै. अधि.
	क्षयरोग रुग्णालय	१,००,०००/-	-	-	१,००,०००/-	जिल्हा क्षयरोग अधि. व अधिक्षक, क्षयरोग रुग्णालय
	कुष्ठरोग रुग्णालय	१,००,०००/-	-	-	१,००,०००/-	अधिक्षक, कु. रु. व त्या रुग्णालयाचे ज्येष्ठ वै. अधि.
	मनोरुग्णालय	१,००,०००/-	-	-	१,००,०००/-	अधिक्षक, मनोरुग्णालय व रुग्णालयाचे ज्येष्ठ वै. अधि.
	संदर्भसेवा रुग्णालय	५,००,०००/-	५,००,०००/-	-	१०,००,०००/	अधिक्षक, संदर्भसेवा रु. व रुग्णालयाचे ज्येष्ठ वै. अधि.

३.४ उपलब्ध साधनसामुग्रीचे नियोजन

स्थानिक पातळीवरील कोणत्याही उपलब्ध साधनसामुग्रीचे नियोजन आपण लोकसहभागातून करू शकतो. त्याआधी आपल्या जवळ म्हणजे ग्रामपंचायत, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय यात असणारी साधनसामुग्री, मनुष्यबळ, पैसा याचा अभ्यास करावा लागेल. त्याचबरोबर संबंधित आरोग्य केंद्राचे प्रश्न शोधणं, त्या प्रश्नांचा प्राधान्यक्रम लावणं, कोणता प्रश्न सर्वात महत्त्वाचा, कोणता प्रश्न आधी सोडवणं गरजेचं आहे. मग तो सोडवण्यासाठी आपल्याकडे काय साधनसामग्री, पैसा, मनुष्यबळ आहे हे बघणे, प्रश्न सोडवण्यासाठी या साधनसामुग्रीचा उपयोग करून उपक्रम/गोष्टी करायच्या आहेत हे ठरवणं आणि ते उपक्रम/ गोष्टी करण्याची जबाबदारी कोणाकडे असेल हे निश्चित करणं शिवाय हे सगळं कधीपर्यंत करायचं हे ठरवणं हे करायला हवं. सर्वच कामांची जबाबदारी आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांची नसते किंवा कार्यकर्त्याची नसते. समित्यांमधील सदस्यांची आणि अध्यक्षांचीही काही प्रमाणात जबाबदारी असते. याची सतत जाणीव करून देणे.

उदा. पुणे जिल्ह्यातील नसरापूर प्राथमिक आरोग्य केंद्राला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि दवाखान्यातील कचरा टाकण्यासाठीची सोय नव्हती. म्हणून रुग्ण कल्याण समितीतील १-२ सक्रिय सदस्यांच्या सहभागाने दवाखान्यातील जुन्या पाण्याच्या टाक्या कापून कचरा टाकण्यासाठीची सोय करण्यात आली आणि ग्रामपंचायत सरपंचांच्या मदतीने आरोग्यकेंद्रात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली.

३.५ समस्या सोडवण्यासाठीचे नियोजन



आजारपण ही ज्याची-त्याची व्यक्तिगत समस्या आहे हा गैरसमज आहे. आपण ज्या विहिरीचं पाणी पितो ते दूषित असेल, घराघरात कुपोषण असेल, गंभीर आजाऱ्यांना तातडीने दवाखान्यात नेता येईल असा रस्ताच गावाला नसेल, कचरा आणि गटारीची व्यवस्था नसल्याने घाणीचे साम्राज्य असेल व या कारणांमुळे आजारपण वाढले असेल तर या समस्या व्यक्तिगत आहेत का? अर्थातच नाही. म्हणूनच या समस्यांवर एकत्र येऊन चर्चा करून योग्य मार्ग काढण्यासाठी आपण गावात सभा/बैठक आयोजित करू शकतो.

आरोग्य हे मुळात पाणी, आहार, निवारा, आर्थिक-सामाजिक घटक इत्यादी घटकांवर अवलंबून असते. या अनेक घटकांपैकी आरोग्यसेवा हा एक घटक आहे. चांगल्या आरोग्यसेवा मिळण्यासाठी प्रयत्न करतानाच काही मूलभूत सेवांची मागणीही आपण करायला हवी. यातील काही घटकांबाबत ताबडतोबीने काही सुधारणा गावबैठकीत करणे शक्य आहे.



उदाहरणार्थ,

'मुत्तोली' हे केरळ राज्यातील एक गांव. संपूर्ण कोट्टायम जिल्ह्यात विकसित आणि प्रथम पारितोषिक मिळवलेली या गावाची ग्रामपंचायत. या गावातील सर्व शासकीय आरोग्य यंत्रणा ग्रामपंचायतीच्या नियोजनाप्रमाणे चालते. शिवाय ग्रामपंचायतीने केलेल्या कामाचे वाचन 'ग्रामसभे'मध्ये केले जाते. गावातील आरोग्यसेवेच्या बाबतीत होमिओ क्लिनिक (होमिओपॅथी दवाखाना), आयुर्वेदिक दवाखाना आणि ॲलोपॅथी दवाखाना यांना ग्रामपंचायत मार्फत निधी दिला जातो. मात्र त्याचे आधी नियोजन ग्रामसभेमध्ये ठरवले जाते. त्यानुसारच निधी वाटून दिला जातो. तसेच डॉक्टरांच्या मागणीप्रमाणे औषधसाठा देखील उपलब्ध केला जातो. ही प्रक्रिया ग्रामसभेतील लोकसहभागाच्या आधारे कशी चालते हे पाहायला हवे तरच आपल्याला विकेंद्रीत नियोजन आणि ग्रामसभेतील ग्रामस्थांचे हक्क अधिकार समजतील. केरळमधील गावातील ॲलोपॅथी सेंटर म्हणजे आपल्याकडचा सरकारी दवाखाना. 'मुत्तोली' गावात डॉक्टर बऱ्याच दिवसांपासून सारख्या सुट्टया घेत होते आणि आले तर कधीही वेळेत येत नव्हते. काही दिवसांनी ही अनियमितता लोकांच्या लक्षात आली, लोकांनी लगेच ग्रामपंचायतीकडे अर्ज स्वरूपात डॉक्टरांची तक्रार केली. याबाबत ग्रामपंचायतीतील लोकप्रतिनिधींनी या प्रकरणाची पूर्ण तपासणी केली आणि डॉक्टरांना सुधारणेबाबत पत्र दिले. परंतु त्याचा डॉक्टरांवर शुन्य परिणाम झाला होता. मग लोकांनी यावर ठोस भूमिका घेण्याचे ठरवले आणि पूर्ण आठवडाभर लोकांनी हॉस्पिटलमध्ये देखरेख (पाळत) ठेवली. त्या डॉक्टरांच्या गैरहजेरी व अनियमिततेचे काही पुरावे गोळा केले आणि ग्रामपंचायतीच्या माध्यमातून एक प्रस्ताव तयार केला. प्रस्तावात म्हटले, आम्हाला हे डॉक्टर नकोत... त्यावर जिल्हापातळीवर लगेच निर्णय व्हावा यासाठी लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केला व काही दिवसातच डॉक्टरांची बदली झाली आणि लोकांना/गावाला चांगला नियमित व गावातच राहणारा निवासी डॉक्टर मिळाला...!

३.५.१ याप्रमाणे गावबैठकीत खालील मुद्यांवर देखील चर्चा करून त्या सोडवण्यासाठीचे स्थानिक नियोजन करता येईल.



- अंगणवाडीतील मुलांचे वजन घेतले गेले का? त्यातील कुपोषित मुलांसाठी पोषण आहार देण्यासाठीचे शासनाला कळवणे शिवाय स्थानिक पातळीवरील निधीतून कुपोषित मुलांसाठी पोषण आहाराची सोय.
- वर्षभर गावाला पुरेसे पाणी, विशेषतः पिण्यायोग्य शुद्ध पाणी सहज मिळते का?
- रेशन दुकानातून पुरेसे धान्य, नियमितपणे मिळते का?
- वर्षभर जवळच्या मोठ्या गावापर्यंत वाहतूक करता येईल असा चांगला रस्ता आहे का?
- सार्वजनिक स्वच्छता आहे का? (दलदल, पाण्याची डबकी, साचलेला कचरा इ. होऊ नये यासाठी व्यवस्था आहे का?)
- साथीच्या आजारांवर नियंत्रण आहे का? (गेल्या तीन वर्षात गावात कधी जुलाब, हिवताप, गोवर, कावीळ या आजारांची साथ आली होती का?)

वरील चर्चेतून आपल्या गावातील आरोग्य समस्यांचे ढोबळ स्वरूप आपल्याला समजू शकेल. त्याआधारे समस्या सोडवण्यासाठी सर्वांना मिळून व प्रत्येकाला काय करता येणे शक्य आहे याचे नियोजन आपल्याला गावातील ग्रामसभेत करणे शक्य होईल.

३.६ शुद्ध पाणी मिळण्यासाठी व सांडपाणी निर्मूलनाची व्यवस्था होण्यासाठी नियोजन



आपल्याला लक्षात ठेवले पाहिजे की पोलिओ होऊ नये यासाठी हजारो कोटी रुपये खर्च करून सार्वत्रिक पातळीवर लसीकरण करण्यात येते व त्यासाठी प्रचंड यंत्रणा व पैसा खर्च केला जातो. पण पिण्यासाठी शुद्ध पाणी व सांडपाण्याची विल्हेवाट व्यवस्थित असेल तर पोलिओ सारख्या अनेक आजारांचे प्रमाण बरेच प्रमाणात कमी होऊ शकते.

शुद्ध पाणी आणि सांडपाणी निर्मूलन या घटकांचा आरोग्यावर निश्चितच परिणाम होत असतो म्हणून कार्यकर्ता

म्हणून, **चांगल्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून या घटकांचे नियोजन होण्यासाठी पुढील गोष्टींचे सुद्धा नियोजन करणे गरजेचे आहे.**

- लोकांच्या नियमित गरजांसाठी पुरेसे व शुद्ध पाणी मिळेल याची खात्री करणे उदा. पिण्यासाठी, वापरासाठी व आंघोळीसाठी.
- स्थानिक गरजांसाठी मिळणारे पिण्याचे शुद्ध पाणी पुरेशा प्रमाणात मिळेल याची खात्री करणे.
- वैयक्तिक व स्थानिक पातळीवर स्वच्छता राहून अस्वच्छ पाण्यामुळे पसरणारे संसर्गजन्य आजार पसरणार नाहीत याची खात्री करणे.
- स्थानिक पातळीवरील मैला कचऱ्याची (वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतागृहे व शौचालये) स्थानिक पातळीवर नीट विल्हेवाट लागेल याची खात्री करणे.
- स्थानिक पातळीवरील निर्माण होणाऱ्या सांडपाण्याची व्यवस्था नीटपणे होईल याची खात्री करणे.
- स्थानिक पातळीवरील निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची व्यवस्था नीटपणे होईल याची खात्री करणे.
- स्थानिक पातळीवर पुरेशा प्रमाणात नाले, शोषखड्डे यांची व्यवस्था होईल याची खात्री करणे.
- पाण्याची टाकी किंवा विहिरींवर डासांची उत्पत्ती स्थाने निर्माण होणार नाही यासाठी विशेष प्रकारची व्यवस्था निर्माण करणे. उदा. साठवलेल्या पाण्यावर डासांची अंडी होऊ नयेच यासाठी विशेष काळजी घेणे.
- पाणी शुद्ध करण्याच्या चांगल्या पद्धती शोधणे, सध्या अस्तित्वात असलेल्या पाणी शुद्धीकरणाच्या पद्धती वापरण्यासाठी आरोग्य शिक्षण देणे. सांडपाणी निर्मूलनासाठी विशेष प्रयत्न केलेल्या पद्धतींचा प्रसार करून त्या सर्वांपर्यंत पोचवण्यासाठी विशेष कार्यक्रम तयार करणे.
- नियमित पाण्याचे शुद्धीकरण होते आहे की नाही, सांडपाण्यामुळे होणारे साथीचे आजार पसरू नयेत यासाठी वारंवार सर्वेक्षण व निरीक्षणे करणे.



३.७ आरोग्यसेवा सुधारण्यासाठी लोकसहभागी नियोजन

रेशनमध्ये भेसळ असली तर तुम्ही दुकानदाराला जाब विचारू शकता. एस.टी. कंडक्टरने अरेरावी केल्यास आपणही 'अरे' ला 'का रे' उत्तर देतो. कधीकधी मत मागायला आलेल्या पुढाऱ्यालाही, 'पाच वर्षे काय केलं?' असा खडा सवाल विचारण्याची आपल्यात हिंमत आहे. पण आपल्याला मिळणाऱ्या आरोग्यसेवांची हेळसांड होत असल्यास आपण नागरिक या नात्याने काय करतो? काही नाही! दवाखान्यात आपला आवाज कमजोर पडतो. कारण आपण दवाखान्यात जातो तेच मुळी आजारी, हतबल अवस्थेत. त्यामुळे रुग्ण म्हणून आपले हक्क-सन्मान यापेक्षा उपचार महत्त्वाचे. डॉक्टरकीचा, वैद्यकीय ज्ञानाचा, आरोग्यसेवा देणाऱ्या यंत्रणेचा (खास सरकारी बाणा व तज्ज्ञपणाच्या भाईगिरीचा) एक दराराही असतोच. या दबदब्यात आपण दबून जातो. त्यामुळे खासगी डॉक्टरांनी अमुक इतकीच फी का घेतली, कशासाठी कोणते औषध दिले, हे विचारण्याची आपल्याला भीती वाटते. सरकारी दवाखान्यातच डॉक्टरांनी खासगी प्रॅक्टिस केली तरी खपून जातं. दवाखान्यात औषधे मिळाली नाही तर खासगीतून विकत घेतो, गावात आरोग्यसेवा द्यायला सरकारी कर्मचारी आले नाही तरी आपण फारसं मनावर घेत नाही. हे प्रश्न असेच सोडून चालणार नाही. आपली उदासीनता झटकून चांगल्या आरोग्यसेवा मिळवण्यासाठी संघटित कृती करायला हवी.

या कृतीचं नियोजित आरोग्य संवाद हे एक चांगले माध्यम आहे.

उदा. १. १४-१५ या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला शासनाकडून महिला आरोग्य ग्रामसभा घेण्याचे एक परिपत्रक आले. त्यानुसार आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख प्रक्रियेतील बऱ्याच गावांमध्ये महिला ग्रामसभा घेण्यात आल्या. त्यात महिलांच्या आरोग्याचे प्रश्न समोर आले आणि प्रशासनाला त्याची काही प्रमाणात का होईना दखल घ्यावीच लागली.

२. गावपातळीवरील आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रश्न आणि त्यांच्यामार्फत दिल्ल्या जाणाऱ्या सेवा-सुविधांबाबत येणाऱ्या अडचणी गावआरोग्य पाणी पुरवठा आणि पोषण आहार या समितीत मांडणे.

३.'ग्रामसभा' ही गामीण भागातील लोकशाही व्यवस्था जिवंत असल्याचे उत्तम उदाहरण आहे.

आजही, भारतात देशाच्या विकासाचा सर्वात प्रमुख श्रोत ग्रामसभेला मानले जाते. महाराष्ट्रात ग्रामसभेच्या माध्यमातून शासनाच्या अनेक लोकहिताच्या ज्याला 'लोक कल्याणकारी योजना' असे म्हटले जाते त्या, सरकारी नियम, नवनवीन धोरणं इत्यादी गोष्टी ग्रामसभेमार्फत गावातील लोकांसमोर मांडले जातात. सोबतच योजनांच्या अंमलबजावणीचे निर्णय व त्यातील लोकांचे हक्क इत्यादींचाही विचार केला जातो. गावातील सार्वजनिक समस्यांवर तोडगा काढणे, कोणाकडून झालेल्या चुकीवर समज देणे, लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठीचे ठोस निर्णय घेण्याची जबाबदारीही ग्रामसभेची आहे. मुळात तो ग्रामसभेचा अधिकारच आहे. म्हणून आरोग्याचे आणि सार्वजनिक आरोग्यसेवांचे प्रश्न नक्कीच मांडू शकतो.

३.८ शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचे नियोजन

आपल्याला माहिती आहेच की, २००७ पासून गावात 'शासकीय आरोग्य विभाग' आणि 'राष्ट्रीय आरोग्य अभियान' यामार्फत नेहमी वेगवेगळ्या योजना राबवल्या जात आहेत. त्या योजनांच्या अंमलबजावणीत स्थानिक पातळीवरील नियोजनाच्या दृष्टीने काही प्रमाणात आपल्याला नक्कीच सहभागी होता येईल.

उदा. गावपातळीवर दर महिन्याला आरोग्य दिवस साजरा करणे हा ठरलेला उपक्रम. हा कार्यक्रम सध्या फक्त लसीकरण दिवस म्हणून गावात राबवला जातो. याचे नीट नियोजन केले आणि संबंधित वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचारी यांना उपक्रमातील लोकसहभागासाठी मदत केली तर गावात यशस्वी पद्धतीने इतर योजनांची माहिती दिली जाऊ शकेल.

उदा. आरोग्य दिवसात काय-काय करणे अपेक्षित आहे?

- हक्काधारित आरोग्यसेवांची माहिती देणे.
- शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे उदा. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, बेटी बचाव कार्यक्रम इत्यादी.
- किशोरी स्वास्थ्य कार्यक्रमा अंतर्गत उपकेंद्राच्या ठिकाणी आणि आरोग्य केंद्राच्या ठिकाणी मैत्री गट स्थापन करून आरोग्य शिक्षण देणे यासारख्या कार्यक्रमांना गती देणे.



- **कुपोषण-** लोकांना पोषण-कुपोषण समजून सांगणे, कुपोषण निर्मूलनासाठी गावात पोषण हक्क गटाची स्थापना करणे, कुपोषित मुलांसाठीच्या पोषण आहाराच्या वेगवेगळ्या योजना राबवणे उदा. गाव दत्तक घेण्यासारखे अंगणवाडी दत्तक घेण्यासाठीची मोहीम राबवणे, मूल कुपोषण मुक्त होईपर्यंत सधन कुटुंबाने ते मूल दत्तक घेणे या प्रकारच्या योजनांचे नियोजन स्थानिक पातळीवर केले जाऊ शकेल.

३.८.१ आरोग्यसेवा आणि सुविधांसंबंधित सर्व शासकीय कार्यक्रमांचे / विभागांचे एकत्रीकरण करून गावपातळीवर एकदिवसीय शिबिर राबवून गावातील लोकांना सेवा पुरवणे

महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात जून २०१५ पासून प्रत्येक गावात महिन्याला एक दिवस सर्व प्रकारच्या आरोग्याच्या सेवा-सुविधा शिबिरामार्फत गावातच दिल्या जातात. या सर्व शिबिरासाठी महिन्यातील एक दिवस निश्चित केलेला आहे. त्या दिवशी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राबवले जाणारे सर्व उपक्रमांचे अधिकारी-कर्मचारी एकत्र येऊन गावातील लोकांना आपापल्या योजनेतील सेवा देतात. म्हणजे, एकात्मिक बालविकास विभागातील कर्मचारी गावातील अंगणवाडी सेविकेच्या मदतीने अंगणवाडीतील सर्व मुलांची तपासणी करतात. त्यातील कुपोषित मुलांची आरोग्य तपासणी आणि उपचार तेथेच केले जातात. राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रमातील वैद्यकीय अधिकारी शाळेतील मुलांची तपासणी आणि पुढील उपचारासाठीची प्रक्रिया लगेच करतात. याशिवाय गावातील जननी सुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांना त्याच दिवशी लाभ दिला जातो. आरोग्य केंद्र पातळीवर होणाऱ्या सर्व तपासण्या गावातच केल्या जातात. आणि त्यांचे अहवालही त्याच दिवशी देऊन उपचार केले जातात. सार्वजनिक आरोग्याबाबत गावातील पिण्याच्या पाण्याचे शुद्धीकरण करणे, स्वच्छता, आरोग्य शिक्षण, गरोदरपणातील सर्व तपासण्या व मार्गदर्शन याप्रकारे साधारण ४५ प्रकारच्या सेवा एकाच दिवशी गावात मिळवून देण्याचे नियोजन जिल्हापातळीवर करण्यात आलेले आहे. अंमलबजावणीसाठी कोणताही वेगळा निधी किंवा योजनेची गरज नाही. गावकऱ्यांना सर्वात मोठा फायदा म्हणजे गाव सोडून दुसऱ्या ठिकाणी किंवा गावापासून लांब आरोग्य केंद्रात जाऊन सेवा घेण्याची गरज नाही, लाभार्थ्यांना अधिकाऱ्यांकडे फेऱ्या मारण्याची गरज नाही किंवा वंचित राहत नाही. ही प्रक्रिया योग्य पद्धतीने राबवली जात आहे की नाही यासाठी जिल्हा पातळीवरून एक पथक त्यादिवशी शिबिराला भेट देत असते. भेटीदरम्यान चेकलिस्टनुसार प्रत्यक्ष पाहणी करण्यात येते.

ग्राम आरोग्य व पोषण दिन पर्यवेक्षण सुची जिल्हा गडचिरोली

पर्यवेक्षण करणाऱ्याचे नाव :-..... हुद्दा.....दिनांक.....

सत्राचे ठिकाण .....उपकेंद्र.....प्रा.आ.केंद्र.....

सत्र सुरु झाल्याची वेळ .....सत्राला भेट देण्याची वेळ .....

सत्र घेतलेले नसल्यास त्याचे कारण .....

1	आरोग्य व पोषण दिनाचा निश्चित दिवस दर्शविणारा बोर्ड गावामध्ये दर्शनी भागावर लावलेला आहे काय?	होय	नाही
2	आरोग्य पोषण दिनाच्या दिवसाबाबत व त्यांच्या स्वरुपाबाबत कोणत्याही १० ग्रामस्थाना विचारल्यानंतर १० पैकी किती लोकांना त्याबाबत माहिती आहे?		
3	सत्राचे दिवशी आरोग्य पर्यवेक्षक/आरोग्य सेविका१ /आरोग्य सेविका/आशा/अंगणवाडी कार्यकर्ती /आसीडीएस पर्यवेक्षिका/आरोग्य सेवक यापैकी गैरहजर असणारे कर्मचारी व त्यांचे कारण		
4	सत्राकरीता संबंधित वैद्यकीय अधिकारी उपस्थित झाले काय / किंवा उपस्थित होणार आहे काय ? (II nd MO 10.00 Am PHU / MO 1.00 PM अपेक्षीत)	होय	नाही
5	पर्यवेक्षकांनी लस व साहित्य त्याच दिवशी शितसाखळी कक्षातून स्वतः आणलेले आहे काय ?	होय	नाही
6	ग्राम आरोग्य पोषण दिनाकरीता लागणारे सर्व साहित्य आणलेले आहे काय ? जे साहित्य / औषधी नसतील ते नमुद करावे.	होय	नाही
7	ICE Pack योग्य स्थितीत आहे काय?	होय	नाही
8	लसीच्या बॉटलसाठी पॉलिथीनचा वापर केला आहे काय?	होय	नाही
9	लसीकरण सत्रात वापरल्या जाणाऱ्या सर्व लसी वारण्यायोग्य तारखेच्या आतील आहेत काय?	होय	नाही
10	व्ही.व्ही.एम. स्टेज १ व २ मधील लस सत्राच्या ठिकाणी आहे काय?	होय	नाही
11	लसीच्या पुर्नघडणानंतर किती वेळ वापरायची याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांना माहित आहे काय?	होय	नाही
12	लस टोचण्याचे तंत्र व मात्रा योग्य आहे काय?	होय	नाही
13	प्रत्येक लस टोचण्यासाठी नेमकी AD Syring वापरली जात आहे काय	होय	नाही
14	प्रत्येक लसीचा Vial वर प्रथम वापर केल्यानंतर तारीख व वेळ टाकण्यात येत आहे काय?	होय	नाही
15	West Product जैवीक कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जात आहे काय?	होय	नाही

३.९ आरोग्य यंत्रणेतील मनुष्यबळाचे / कर्मचाऱ्यांच्या कामाचे नियोजन

गावातील आरोग्य कर्मचारी नियमित गावभेटी देतात की नाही, कोण-कोणती कामे करतात, हे समजून त्यामध्ये आवश्यक बदल आणण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या गावपातळीवरील कामांचे नियोजन करणे खूप महत्त्वाचे आहे.

गावपातळीवर प्राथमिक आरोग्यसेवा देण्याची जबाबदारी स्त्री आरोग्यसेवक (एएनएम) आणि पुरुष आरोग्यसेवक (एमपीडब्ल्यू) यांच्यावर आहे. म्हणजे गावात,

- नियमित लसीकरण सत्र घेणे,
- गरोदर स्त्रियांना सल्ला मार्गदर्शन करणे,
- आजारांचा पाठपुरावा करणे,
- पाणीसाठ्यांच्या निर्जंतुकीकरण करण्यासाठी तपासणी
- साध्या आजारांवर उपचार

इत्यादी कामे या आरोग्य कर्मचाऱ्यांची करायची असतात. पण बऱ्याच वेळा गावकऱ्यांना त्यांची कामे माहिती नसतात. आणि हे आरोग्य सेवक गावात कधी आले, कधी गेले हे देखील लोकांना समजत नाही. परिणामी आवश्यक सेवा नीट पोहचत नाही किंवा दिल्या जात नाही. गावातील सर्वांपर्यंत पोहोचत नाही. म्हणून गावातील सर्वांना आरोग्य कर्मचाऱ्यांचे कामाच्या दिवसांची माहिती असणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांच्या कामाचे नियोजन स्थानिक / गावपातळीवर होण्यासाठीचे पावले उचलण्याची गरज आहे.











उदा. कॅलेंडर कार्यक्रम



आारोग्य कर्मचाऱ्यांनी गावात कधी भेट दिली व काय काम केले याची नोंद लोकांनी ठेवण्यासाठी 'साथी' संस्थेने 'आरोग्य सेवा कॅलेंडर' विकसित केले. देखरेख प्रक्रियेतील सहयोगी संस्थांनी आरोग्य सेवा कॅलेंडरच्या साहाय्याने आरोग्य सेवातील त्रुटी उघड करण्यासाठी आधार मिळाला. नंदुरबार जिल्ह्यात कॅलेंडर कार्यक्रमाचा बराच वापर केला गेला. आदिवासी भागातील दुर्गम गावे, वाड्या-वस्त्या जिथे आहेत तिथे खात्रीलायक प्राथमिक आरोग्यसेवा पोहोचण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी जाहीर कॅलेंडर कार्यक्रम घेऊन लोकांना कॅलेंडरवरील माहिती व त्यावरील नोंदी ठेवण्याची पद्धती समजावून सांगितली. या कार्यक्रमाला सर्व ग्रामपंचायत सदस्य, आरोग्य कर्मचारी यांनाही बोलावण्यात आले. आणि सर्वांसमोर माहिती दिली. त्यामुळे लोकांना आरोग्यसेवांची माहिती मिळाली व आरोग्य कर्मचाऱ्यांनाही नियमित आणि ठरलेल्या वेळी गावभेटी करणे भाग पडले.

३.१० कार्यकर्ता म्हणून आपण काय करू शकतो ?

वरीलप्रमाणे आपणही गावात आरोग्य कर्मचारी म्हणून आशा कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेवक / सेविका यांच्या कामाचे नियोजन गाव बैठकीत किंवा गाव आरोग्य पाणी पुरवठा आणि स्वच्छता समितीच्या बैठकीत करू शकतो. आरोग्याच्या नवनवीन योजनांचे अंमलबजावणीसाठीचे नियोजन कर्मचारी आणि अधिकारी यांच्यासोबत बसून त्यांना काही जबाबदाऱ्या देऊन गावातील प्राथमिक आरोग्यसेवा सुधारू शकतो.

३.११ थोडक्यात पण महत्त्वाचे

१) नियोजन म्हणजे काय?

- आरोग्याबद्दल आपण कोणत्या गोष्टींचे नियोजन करू शकतो?

२) नियोजन करणे म्हणजे फक्त पैशाचा जमाखर्च ठरवणे नाही.

- गावपातळीवरील किंवा आरोग्य केंद्रस्तरावरील नियोजनआपण कार्यकर्ता म्हणून अबंधित निधीचे काय करू शकतो
- आरोग्य केंद्रांना मिळणाऱ्या रुग्ण कल्याण समिती निधीचे नियोजन

३) उपलब्ध साधनसामुग्रीचे नियोजन

४) समस्या सोडवण्यासाठीचे नियोजन

- गावबैठकीत कोणत्या मुद्यांवर चर्चा करून त्या सोडवण्यासाठीचे स्थानिक नियोजन करता येईल?

५) शुद्ध पाणी मिळण्यासाठी व सांडपाणी निर्मूलनासाठी व्यवस्था होण्यासाठीचे नियोजन

६) आरोग्यसेवा सुधारण्यासाठी लोकसहभागी नियोजन

७) शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचे नियोजन

- गावपातळीवर आरोग्यसेवा आणि सुविधांसंबंधीत सर्व शासकीय कार्यक्रमांचे नियोजन

८) आरोग्य यंत्रणेतील मनुष्यबळाचे / कर्मचाऱ्यांच्या कामाचे नियोजन

- कॅलेंडर नियोजन

३.१२ सरावासाठी प्रश्न

३.१२.१ नियोजन म्हणजे काय?

३.१२.२ आरोग्याबद्दल आपण कोणत्या गोष्टींचे नियोजन करू शकतो?

३.१२.३ आपण कार्यकर्ता म्हणून कोणकोणत्या अबंधित निधीचे नियोजन करू शकतो?

३.१२.४ गाव बैठकीत कोणत्या मुद्यांवर चर्चा करून त्या सोडवण्यासाठीचे स्थानिक नियोजन करता येईल.

३.१२.५ आरोग्यसेवा सुधारण्यासाठी लोकसहभागी नियोजनाचे एक उदाहरण द्या.

३.१२.६ आरोग्य दिवसात काय-काय करणे अपेक्षित आहे?

३.१२.७ कार्यकर्ता म्हणून आपण कोण-कोणत्या आरोग्य कर्मचाऱ्यांचे नियोजन करू शकतो.

परिशिष्ट- १

आरोग्य ग्रामसभा शासन निर्णय

ग्रामसभेमध्ये आरोग्यविषयक जनजागृती
होण्यासाठी आरोग्याबाबतचे विषय
घेण्याबाबत..

Dy CEO (VP)
28/06

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक:- व्हीपीएम-२०१४/प्र.क्र.८०/पंरा-३
बांधकाम भवन २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दिनांक:- २६ जून, २०१४.

प्रस्तावना:-

ग्रामसभा ही ग्रामीण लोकशाही व्यवस्थापनावरील सर्वोच्च यंत्रणा आहे. देशाचा खऱ्या अर्थाने विकास होण्यासाठी ग्रामसभा सर्वात प्रमुख स्त्रोत मानली जाते. महाराष्ट्र राज्यात ग्रामसभेद्वारे अनेक विषय सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणे प्रभावशाली होण्याकरीता अनेक विषयांचे ग्रामसभेद्वारे आयोजन करण्यात येते. त्याप्रमाणेच आरोग्य विषयक जनजागृतीचे विषय ग्रामसभेमध्ये घेण्याकरीता आरोग्य विभागाचे मा.मंत्री (आरोग्य) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये "आरोग्य ग्रामसभा" विषय ग्रामसभेत प्राधान्याने मांडून आरोग्य खात्याकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती, जनतेचे आरोग्य विषयक प्रश्न, आरोग्य सेवांची अंमलबजावणी करण्याची पध्दत तसेच राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या नवनवीन लोकाभिमुख योजनांची माहिती देणे, विविध आरोग्य विषयक कार्यक्रम व जनतेला मिळणाऱ्या सुविधाबाबत वेळेवर व शास्त्रोक्त माहिती देणे सोयीचे होण्याच्यादृष्टीने ग्रामीण पातळीवर सखोल चर्चा होण्याकरीता व महसुली गावांमध्ये आरोग्य विभागाची "आरोग्य ग्रामसभा" आयोजित करण्याची प्रभावीपणे गरज आहे. या उद्देशाने ग्राम स्तरावर वार्षिक आरोग्य विषयक जनजागृतीचे विषय घेऊन ग्रामसभा आयोजित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. या परिपत्रकाद्वारे आरोग्य विषयक जनजागृतीकरीता राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

आरोग्य विषयक जनजागृतीचे विषय या ग्रामसभेमध्ये घेण्याबाबतचा कालावधी, उद्दीष्टे व त्यासंबंधीचे विषय खालीलप्रमाणे राहतील:-

परिपत्रक:-

१) ग्रामसभेचा कालावधी-

वर्षातून एकदा "आरोग्यविषयक जनजागृती ग्रामसभा" हा विषय ग्रामसभेमध्ये

कृ.मा.प....

E:\PRA-3\Gramsabha\८०-१४ आरोग्य ग्रामसभा.docx

आरोग्यासंबंधीचे विषय घेऊन दि २४ एप्रिल ते १ मे (पंचायत राज ते महाराष्ट्र दिन) या कालावधीमध्येघेण्यात यावेत.

१) <u>या ग्रामसभेची उद्दीष्टे :-</u>

१. ग्रामपातळीवरील जनतेस आहार व आरोग्याच्यादृष्टीने विविध योजनांबाबत शास्त्रोक्त माहिती देणे.
२. ग्रामपातळीवरील जनतेस विविध आहार व आरोग्य योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करणे.
३. आहार व आरोग्यविषयक योजनांच्या नियोजनांमध्ये जनतेचा सहभाग वाढविणे.
४. गावच्या पंचक्रोशितील आरोग्य संस्थांबाबत माहिती देणे.
५. आरोग्य संस्थेत उपलब्ध असलेले विविध कार्यक्रम, सेवा व सुविधांबाबत माहिती देणे.
६. आरोग्य सुविधा पुरविणाऱ्या यंत्रणेबाबत माहिती देणे.
७. ग्रामपातळीवर पुरविण्यात येणाऱ्या ग्राम आरोग्य पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती अंतर्गत संबंधित निधी वापराबाबत नियोजन करणे.

२) <u>या ग्रामसभेमध्ये आरोग्यविषयक चर्चा करावयाचे विषय-</u>

१. माता संगोपन व बाल संगोपन.
२. जननी शिशू सुरक्षा योजना
३. नियमित लसीकरण
४. ग्राम बालविकास केंद्र
५. बाल उपचार केंद्र
६. पोषण पुनर्वसन केंद्र
७. आजार नियंत्रण प्रकल्प
८. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम
९. ग्राम आरोग्य पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती
१०. मोबाईल मेडिकल युनिट
११. आदिवासी भागांकरीता विशेष योजना
१२. रुग्ण कल्याण समिती
१३. राष्ट्रीय आरोग्यविषयक कार्यक्रम
१४. टोल फ्री दूरध्वनी क्र. १०२, १०४, १०८ बाबत माहिती
१५. आशा.

२. ग्रामीण जनतेचे आरोग्य सुधारण्यासाठी आरोग्यविषयक विषय या ग्रामसभेमध्ये घेणे अत्यंत गरजेचे आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत गावपातळीवर निधी वितरीत करण्यात येतो व या निधीचे योजनाबध्द पध्दतीने खर्च होण्याच्यादृष्टीने दि.२४ एप्रिल ते १ मे (पंचायत राज ते महाराष्ट्र दिन) या कालावधीमध्ये या विषयाबाबत ग्रामसभा घ्यावी. तसेच या ग्रामसभेचे आयोजन सर्व ग्रामपंचायतींना कळवून त्याप्रमाणे सभा होतील याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(डॉ. नरेश गिते) 26/6/14

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा. मंत्री ग्राम विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६. मा. राज्यमंत्री ग्राम विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
७. सर्व मा. विधानसभा / विधानपरिषदेचे सदस्य
८. सर्व प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे.
११. आयुक्त, कुटुंब कल्याण व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
१२. अवर सचिव, आरोग्य-७, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१४. सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
१५. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
१६. सर्व मंत्रालयीन विभाग
१७. ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासन अधिकारी
१८. निवडनस्ती (कार्यासन क्रमांक पंरा-३).

*****

E:\PRA-3\Gramsabha\२०१४-१४ आरोग्य ग्रामसभा.docx

सामाजिक सेवांवर सामाजिक उत्तरदायित्वाविषयी कार्यकर्त्यांचा व्यापक व विशाल दृष्टिकोन तयार करण्यासाठी **'साथी' संस्थेने 'आरोग्यसेवांचे सामाजिक उत्तरदायित्व - प्रमाणपत्र कोर्स'** विकसित केला आहे. या कोर्सचा कालावधी एक वर्षाचा असून, या कोर्सला **'कर्वे समाज सेवा' संस्था, पुणे** या सामाजिक कार्याचे शिक्षण देणाऱ्या संस्थेची मान्यता मिळाली आहे.

कोर्सची वैशिष्ट्ये

- सामाजिक कार्याचे शिक्षण देणाऱ्या **कर्वे समाज सेवा संस्था, पुणे** यांची मान्यता.
- **शिक्षणाची अट -** किमान दहावी
- **संपर्क सत्र -** वर्षातून दोन संपर्क सत्र वर्षाअखेर प्रमाणपत्र प्रदान सोहळा
- **अभ्यास साहित्य -** आरोग्य अधिकाराच्या क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञांनी विकसित केलेले अभ्यासपूर्ण वाचन साहित्य.
- **सोशल मीडिया -** दृक श्राव्य (Audio-Visual) माध्यमाच्या भरपूर उपयोग, पोस्ट, इंटरनेट, व्हॉटस् अप ग्रुपवरून माहितीची देवाण घेवाण.
- **दृष्टिकोन विकास -** आरोग्य व आरोग्यसेवेचा अधिकार, सार्वजनिक व खासगी आरोग्यसेवांवर देखरेख कशी करावी याची सखोल व व्यापक माहिती.
- **फिल्ड वर्क व अहवाल लेखन -** कार्यक्षेत्रात प्रत्यक्ष कामाचा अनुभव व केलेल्या उपक्रमाचे अहवाल लेखन कसे करायचे याचे आमच्या तज्ज्ञांकडून नियमित मार्गदर्शन.

आयोजक

साथी

मान्यता

ESTD. 1963
कर्वे समाज सेवा संस्था

अर्थसाहाय्य

कोपासा

SATHI - Flat No. 3 & 4, Aman E Terrace, Dahanukar Colony, Kothrud, Pune - 411029
Ph. No. (020) 25472325, 7588032218
Website - www.sathicehat.org, Email - sathicehat@gmail.com

March.2016